कुटुंब, मित्र आणि निसर्गासोबत एक अविस्मरणीय दिवस!
हा सुट्टीचा महाआनंद आणि धमालच धमाल....
आमरस पार्टी वनभोजन
रेन डान्स / बोटींग / पपेट शो बर्डपार्क / झीप लाईन ॲडव्हेंचर्स / वॉटर स्पोर्टस्
साईबन
9112288622
9850500905 / 9096639368
डॉ. कांकरियांचे साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी.मागे, अहिल्यानगर

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०५.०६.२०२६ | अंक नं. ०५६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ १९९/-*
2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# अहिल्यानगरमध्ये पुढील ५ दिवस वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस

## हवामान खात्याचा अंदाज; सतर्कतेचा इशारा; मान्सून केरळमध्ये दाखल

मुंबई/ नगर – तीन दिवस उशिराने म्हणजेच ४ जून रोजी मान्सून केरळमध्ये दाखल झाला आहे. पुढील काही दिवसात मान्सून महाराष्ट्रात पोहोचणार आहे. पण त्यापूर्वीच हवामान विभागाने महाराष्ट्राला वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. वीजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात पुढील ५ दिवस सतर्कता बाळगण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. हवामान विभागाने दिलेल्या ताज्या अंदाजानुसार, विदर्भासह राज्यातील अनेक जिल्ह्यांत वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

हवामान विभागाने ५ जून रोजी प्रसिद्ध केलेल्या अंदाजानुसार, अहिल्यानगर जिल्ह्यात पुढील पाच दिवस सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पावसाचे वातावरण राहण्याची अत्यंत दाट शक्यता वर्तविली आहे. ५ व ७ जून या दोन्ही दिवशी जिल्ह्यात काही ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह वादळ, पाऊस होण्याची शक्यता वर्तविली आहे. तसेच ४०-५० किमी प्रतितास वेगाने सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे. ६ व ८ जून रोजी काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि ३०-४० किमी प्रतितास वेगाने सोसाट्याचे वारे येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. ९ जून रोजी जिल्ह्यात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

तसेच अमरावती, वर्धा आणि चंद्रपूर या तीन जिल्ह्यांसाठी वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या भागांत सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच राज्यात उर्वरित ठिकाणी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. सिंधुदुर्गसह पुणे, सातारा, कोल्हापूरच्या घाटमाथ्यावर जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. रायगड, रत्नागिरी, जळगाव, नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, बुलडाणा, अकोला, वाशीम, नागपूर, भंडारा, गोंदिया, यवतमाळ आणि गडचिरोली या जिल्ह्यांतही वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी केरळमध्ये प्रवेश केल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण आहे. यंदा मान्सूनचे आगमन नेहमीपेक्षा तीन दिवस उशिरा झाले असले, तरी पावसाची हजेरी लागल्याने शेती कामांना गती मिळणार आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील काही दिवसांत मान्सून संपूर्ण गोव्यासह महाराष्ट्रात दाखल होण्याची शक्यता आहे. या पावसामुळे तापमानात घट होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

विजा चमकत असताना बाहेर उघड्यावर असणे धोकादायक असते. त्यामुळे पक्क्या घराच्या किंवा इमारतीच्या आत आश्रय घ्यावा. मोकळ्या जागेत थांबू नये. जर तुम्ही बाहेर असाल तर झाडाखाली, विजेच्या खांबाजवळ किंवा उंच टॉवरच्या खाली उभे राहू नका, विजा चमकत असताना तलाव, नदी किंवा कोणत्याही जलस्रोताजवळ जाऊ नका, कारण पाणी विजेला आकर्षित करते. घरातील विजेवर चालणारी उपकरणे, दूरध्वनी किंवा संगणक यांचा वापर टाळणे सुरक्षित ठरते, कारण वीज वाहिन्यांतून विद्युत प्रवाहाचा धोका असू शकतो. छत्री, सायकली किंवा शेतीची अवजारे यांसारख्या धातूच्या वस्तूंपासून लांब राहा, कारण धातू विजेला आकर्षित करतात. जर तुम्ही प्रवास करत असाल, तर कारमध्येच बसून राहा. खिडक्या बंद ठेवा आणि बाहेर पडणे टाळावे, अशी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त कापड मॉल महावीर मॉल
स्वस्त म्हणजे नक्की काय असतं..?
रेनकोट आणि छत्री महोत्सव
पावसाळा सुरू होण्यापूर्वी पावसाळ्याची तयारी करूया
झील आणि वर्षा रेनकोटवर सरसकट 20% डिस्काउंट
१० जून पर्यंत रेनकोट खरेदी करा आणि अधिकचा डिस्काउंट मिळवा..
सर्व फ्रेश स्टॉक, नवीन डिझाईन रेडी स्टॉकमध्ये उपलब्ध
* सर्व शालेय मुलांचे सॅक वाले रेनकोट मिळतील.
* लेडीज रेनकोट मिळतील.
अधिक माहितीसाठी भेट द्या.. श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

# स्वतःच्या गाडीची चोरी भासवून 'इन्शुरन्स लाटण्याचा' कट उघड

नगर – स्वतःच्या मालकीची स्कॉर्पीओ गाडी चोरीला गेल्याची खोटी तक्रार देऊन विमा कंपनीकडून विम्याची रक्कम लाटण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला. या प्रकरणी फिर्यादीसह तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, १० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

शहरातील मुकुंदनगर येथील रहिवासी अर्शद आयुब शेख याने त्याची स्कॉर्पीओ गाडी चोरीला गेल्याची तक्रार तोफखाना पोलीस ठाण्यात नोंदवली होती. यावरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, शहरात वाढत्या वाहन चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला गुन्हेगारांचा शोध घेण्याचे आदेश दिले होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे आणि त्यांच्या पथकाने तपास सुरु केला. ४ जून २०२६ रोजी पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीवरून, संशयित आरोपी मैनुद्दीन शकील पठाण (वय २१, रा. टिळकनगर, श्रीरामपूर) याला ताब्यात घेण्यात आले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने इन्शुरन्ससाठी वाहन चोरीचा कट रचल्याची धक्कादायक कबुली दिली. फिर्यादी अर्शद आयुब शेख याच्या सांगण्यावरून आणि तिसरा साथीदार सलमान मेहबूब खान (वय २१, रा. कोठला, अहिल्यानगर) याच्या मदतीने हा संपूर्ण बनाव रचला होता, असे त्याने कबूल केले. इन्शुरन्स क्लेम मिळवण्यासाठी स्कॉर्पीओ गाडी मुद्दाम चोरल्याचे आरोपींनी कबूल केले. पोलिसांनी तात्काळ तिन्ही आरोपींना अटक करीत गुन्ह्यात वापरलेला ५ लाख रुपये किमतीचा छोटा हत्ती टेम्पो आणि ५ लाख रुपयांची स्कॉर्पीओ गाडी असा एकूण १० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. तिन्ही आरोपींना तोफखाना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून, पुढील तपास तोफखाना पोलीस करत आहेत. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार शाहिद शेख, सुनील पवार, फुरकान शेख, अरविंद भिंगारदिवे, योगेश भिंगारदिवे, गणेश धोत्रे आणि प्रशांत राठोड यांनी केली.

(छायाचित्र पान २ वर)

क्वॉलिटीत भारी.. किंमतीत कमी
पुरुषांसाठी व मोठ्या मुलांसाठी बिगसाईज ब्रँण्डेड रेडिमेड कपडे
शर्ट, क्राडशेट 7XL पर्यंत | टिशर्ट 6XL पर्यंत | नाईटपॅन्ट 4XL पर्यंत | जिन्स, फॉर्मल पॅन्ट 44 साईज पर्यंत
किंमत होलसेल व ऑनलाईन पेक्षा स्वस्त
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही मयुरी लेडिज मॉलच्या वर शुभ मॉल
वेळ : सकाळी १०.३० ते रात्री ८.३० पर्यंत
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188

अधिक मासातील खास स्पेशल धोंडा थाळी
पूरण पोळी, आमटी, आमरस, पनीर भाजी, सूकी भाजी, आलू रजवडी, दालफ्राय अजुन बरेच काही..
स्पेशल आमरस 400/- किलो
पार्सल सुविधा उपलब्ध
महेंद्र पेडावाला रजवाडी गुजराती थाळी
कापड बाजार, अहिल्यानगर.
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय

Kashmir
Starts @ For 4 nights 5 Days 16800/-
Packages Available 5D, 6D, 7D...
Namoh Since 1981 A Total Travel Solution...
For details contact :- 73505 30009 | 73505 40009 | 73505 50009
www.namohtours.com

ADMISSION OPEN MAHA DISCOUNT
JUST IN ANY COURSE 1800/-
www.dishagroup.in
An ISO 9001:2015 Certified
DISHA® COMPUTER INSTITUTE
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch: Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769
COURSES
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, 3D CAD
CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, INDESIGN
C, C++, CANVA, CHATGPT, BANKING, TAXATION

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# केडगाव परिसरात अनैतिक प्रकार; त्रस्त रहिवाशांचे प्रशासनाला निवेदन

नगर – केडगाव (नगर–दौंड रोड) येथील इंदिरानगर परिसरात संशयास्पद व अनैतिक प्रकार वाढल्यामुळे त्रस्त रहिवाशांनी कोतवाली पोलीस, पोलीस अधीक्षक आणि महानगरपालिकेला निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे.

परिसरातील खोल्यांमध्ये कोणत्याही कौटुंबिक पार्श्वभूमीशिवाय अनोळखी महिला व पुरुषांची दिवस–रात्र संशयास्पद ये–जा सुरू असते. पैशांच्या हव्यासापोटी घरमालकांनी या भाडेकरूंचे 'पोलीस व्हेरिफिकेशन' देखील केलेले नाही. या जागेचा वापर अनैतिक व व्यावसायिक स्वरूपाच्या शारीरिक संबंधांसाठी होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या प्रकारामुळे परिसराची बदनामी होत असून महिला व लहान मुलांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने या ठिकाणी तात्काळ प्रत्यक्ष चौकशी करून संबंधित घरमालकांवर व संशयास्पद व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली असून, या निवेदनावर गोरख जाधव, उमेश गायमुखे, दौलत पाटोळे, अमोल मिरपगार, शाम कांबळे आदींसह स्थानिक भागातील नागरिकांच्या सह्या आहेत.

# त्यांना मुस्लिम सूचक चालतो कसा?; एमआयएम राष्ट्रवादी काँग्रेसची 'बी टीम'

## दिवसा हिंदुत्व, रात्री हातमिळवणी?; विधान परिषद नाट्यावर किरण काळेंचा घणाघात




नगर – लोकशाहीत प्रत्येकाला निवडणूक लढण्याचा अधिकार आहे. निवडणुका पारदर्शकच झाल्या पाहिजेत. मात्र विधान परिषद निवडणुकीच्या अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालय रात्री उशिरापर्यंत बेकायदेशीरपणे कसे सुरू राहिले?, असा सवाल ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे. त्यांना सोयऱ्यांच्या विधानपरिषद अर्जावर एमआयएम पक्षाचा मुकुंदनगरचा मुस्लिम नगरसेवक सूचक कसा काय चालतो?, असा सवाल त्यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नाव न घेता केला.

काळे यांनी समाज माध्यमांवरून नेटकऱ्यांशी संवाद साधला. हा संवाद मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. राष्ट्रवादीचे बंडखोर उमेदवार दत्तात्रय पानसरे यांच्या अर्जावर एमआयएमचे नगरसेवक शहबाज अहमद सय्यद यांची सूचक म्हणून स्वाक्षरी होती. दुपारी तीन वाजण्यापूर्वी सूचकाने अर्ज मागे घेतल्यानंतर रात्री उशिरापर्यंत हाय व्होल्टेज राजकीय नाट्य रंगले.

यावर टीका करताना काळे म्हणाले, पानसरे यांची बंडखोरी कुणाच्या इशाऱ्यावर होती हे सर्वांनाच ठाऊक आहे. जे स्वतःला कट्टर हिंदू धर्मरक्षक म्हणवतात त्यांनीच मुकुंदनगरच्या आपल्या पूर्वाश्रमीच्या कट्टर कार्यकर्त्याला सोयऱ्यांचे सूचक केले. एका बाजूला एखाद्या समाजाविरोधात टोकाची भूमिका घ्यायची आणि दुसऱ्या बाजूला त्यांच्याशी हातमिळवणी करायची, ही दोन्ही समाजाशी अनैतिक वर्तणूक आहे.

काळे पुढे म्हणाले, सर्वसामान्य नागरिक कार्यालयीन वेळ संपल्यानंतर एक–दोन मिनिटे उशिरा गेला तरी त्याला प्रवेश मिळत नाही. मतदानाची वेळ संपल्यानंतर मतदाराला बूथवर उभे केले जात नाही. मग अर्ज माघारीची मुदत दुपारी तीन वाजता संपल्यानंतर रात्री उशिरापर्यंत जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे कार्यालय सुरू कसे राहिले? निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता संपुष्टात आली असून जनतेचा यंत्रणेवरील विश्वास उडाला आहे झाल.

**एमआयएम ही बी टीम :** अहिल्यानगर शहरातील एमआयएम ही राष्ट्रवादीचीच बी टीम असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले असल्याचा आरोप काळे यांनी केला आहे. काळे म्हणाले, मुस्लिम समाजाच्या मतांवर निवडून येऊन जातीयवादी राष्ट्रवादीचा सूचक बनत जातीयवादी शक्तींना मदत करणाऱ्या प्रवृत्तींना मुस्लिम समाजाने खड्यासारखे बाजूला केले पाहिजे. हिंदुत्ववादी तरुणांनीही राजकीय नेत्यांच्या दुटप्पी भूमिकांचे आत्मपरीक्षण केले पाहिजे. भविष्यातील निवडणुका जिंकण्यासाठी एमआयएमच्या आडून धर्मनिरपेक्ष मतांमध्ये फूट पाडण्याचे आणि धार्मिक ध्रुवीकरणाचे राजकारण सुरू आहे. अहिल्यानगरकरांनी हा धोका वेळीच ओळखावा. निवडणुका विकासाच्या मुद्द्यांवर व्हाव्यात. रस्ते, पाणी, वीज, महिला सुरक्षा, युवकांसाठी रोजगार, उद्योग–व्यापार यासाठी सत्तेचा वापर व्हावा; राजकीय पोळ्या भाजण्यासाठी नव्हे, असा टोला काळे यांनी लगावला.



स्वतःच्याच वाहन चोरीचा बनाव करणाऱ्या आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली.

# धारदार शस्त्रांचा धाक दाखवून कार चालकाला लुटले

## साईबन परिसरातील घटना, चार अनोळखी चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल

नगर – निंबळक गावाच्या शिवारातील साईबन भागात दोन दुचाकींवरून आलेल्या चार अनोळखी चोरट्यांनी एका कार चालकाला धारदार शस्त्रांचा धाक दाखवून लुटल्याची घटना घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चार आरोपींविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सागर सिताराम तळेकर (वय ३९, रा. निर्मलनगर, सत्कार कॉलनी, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २० मे रोजी रात्रीच्या सुमारास निंबळक शिवारातून आपल्या मारुती कारने घराकडे निघाले होते. दरम्यान, दोन विना नंबरच्या स्कुटीवरून आलेल्या चार अनोळखी इसमांनी त्यांची कार अडवली. चोरट्यांनी तळेकर यांना लोखंडी चाकू, कुऱ्हाड, धारदार कटर आणि कोयत्याचा धाक दाखवून त्यांच्या जवळील मुद्देमाल बळजबरीने चोरून घेतला.

या लुटीमध्ये चोरट्यांनी फिर्यादीच्या कानातील सोन्याची बाळी, गळ्यातील सोन्याचे बदाम, डिजिटल स्मार्ट घड्याळ आणि रोकड असा एकूण ३० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लुटून नेला. चोरी केल्यानंतर आरोपींनी तळेकर यांना पोलिसात गेल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. या भीतीमुळे फिर्यादीने तात्काळ तक्रार दिली नव्हती, मात्र मनस्थिती सुधारल्यानंतर त्यांनी ४ जून रोजी पोलिसात धाव घेतली. या घटनेचा पुढील तपास सपोनि. माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जाधव करत आहेत.

# दंगल घडवण्याचे उद्देशाने काही दंगलखोर संघटन नगर जिल्ह्यात सक्रिय

## गंगा उद्यानात नमाज पठण सर्व प्रकरण बनावटी ? : डॉ. परवेज अशरफी



नगर – काही दिवसापूर्वी नगर महानगरपालिका हद्दीतील गंगा उद्यान येथे काही बुरखाधारी व्यक्तींनी नमाज पठण केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. व्हिडिओ व्हायरल होताच काही जातीवादी संघटना आणि नगरचे लोकप्रतिनिधी यांनी त्या ठिकाणी आंदोलन करून हनुमान चालीसा व हवन आणि वराह पूजा करून शुद्धीकरण केले.

सदर व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे नगर शहर व जिल्ह्यामध्ये वातावरण दूषित होत असल्याचे निदर्शनास आले. परंतु तो व्हिडिओ व्यवस्थित पाहिलं तर त्यात काही टेक्निकल बाबी आढळून आले आहे. सदर बुरखाधारी नमाज पठण ज्या दिशेने करत आहे त्या दिशेने भारतीय मुस्लीम नमाज पठण करत नाही. त्यामुळे भारतात राहणाऱ्या मुस्लिम समाज हा काबा च्या दिशेने म्हणजेच सूर्य अस्तच्या दिशेने नमाज पठण करतो. परंतु सदर बुरखाधारी हे नमाज पठण काबा च्या दिशेने न करता उत्तरेचे दिशेने करत असल्याचे दिसते याच्याच अर्थ सदर बुरखाधारी हे मुस्लिम समाजाचे किंवा इस्लाम धर्माला मानणारे नसावेत. तसेच नमाज पठण करण्याच्या अगोदर वजू करणे म्हणजे योग्यरित हातपाय धुणे अनिवार्य आहे. परंतु गंगा उद्यान मध्ये अशी कोणती सोय नसल्याने त्या ठिकाणी मुस्लिम समाजाचे महिला नमाज पठण करणे टाळतील. गंगा उद्यानात वेगवेगळ्या ४ पायाचे जनावर त्या ठिकाणी आढळून येतात आणि घाण करून जातात अशा ठिकाणी मुस्लिम समाजाचे व्यक्तीने नमाज पठण करणे हे शक्य नसल्याने शंका निर्माण होणे साहजिक आहे.

भारतामध्ये असे अनेक प्रकार रोज घडत आहे की काही पुरुष बुरखा घालून मंदिराच्या समोर अनावश्यक वातावरण खराब करणाऱ्या गोष्टी करतात आणि पळून जातात. यातले काही पकडले गेल्याने लोकांचे लक्षात आले की बुर्खायाचे आत मध्ये महिला नसून पुरुष आहे आणि तेही मुस्लिम समाजाचा नसून इतर समाजाचे आहेत.

व्हिडिओ व्हायरल होताच काही जातीवादी संघटना इतके तातडीने उद्यानात आले जसेकाय ते या व्हिडिओची प्रतीक्षा करत होते. येतांना त्यांनी सर्व समग्री सोबत आणली आणि हवन, भजन कीर्तन हनुमान चालीसा आणि वराह पूजा हे सर्व केले.

नगरचा लोकप्रतिनिधी आणि जातीवादी संघटना या उद्यानात हजर झाले यावरून असे दिसते की व्हिडिओ काढणे आणि ते त्यांच्या ग्रुपवर टाकणे आणि लगेच संबंधित टोळी हे उद्यानात येऊन धिंगाणा घालणे हे सर्व पूर्ण नियोजित आणि योग्य रीतीने षडयंत्र भाग असल्याचे दिसते.

डॉ. परवेज अशरफी यांनी प्रशासनाला प्रश्न विचारले की जर नमाज पठण सार्वजनिक ठिकाणी केल्यास त्यांच्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो तर त्याच ठिकाणी हनुमान चालीसा, हवन वराह पूजा होत असेल तर त्यांच्यावर गुन्हा दाखल का होत नाही? निवेदनाद्वारे विनंती करण्यात आली आहे की संबंधित बुरखाधारी महिला व पुरुष प्रशासनाने शोधावे व तातडीने अटक करावी. त्याचबरोबर ज्या व्यक्तीने व्हिडिओ काढून व्हायरल केला त्यालाही अटक करून त्याच्याकडून माहिती उपलब्ध करून घ्यावे जेणेकरून हा सर्व षडयंत्र जनतेसमोर येईल.

ईदच्या दिवशी माळीवाडा भागात जे घडले त्यात एक बुरखाधारी आढळले परंतु ती महिला की पुरुष हे अद्याप समजले नाही परंतु त्यातही काही त्रुटी असल्याचे प्राथमिक निदर्शनास आले आहे. प्रशासनाने त्याचा योग्य छडा लावल्यास त्या ठिकाणी तो प्रकार एक षड्यंत्र असल्याचे जनते समोर येईल.

गंगा उद्यान या प्रकरणाचा योग्य रीतीने तपास करून दोषींवर कारवाई झाली नाही तर या षडयंत्र करणाऱ्या टोळीची हिम्मत वाढेल आणि भविष्यात असे प्रकार सर्रास घडताना आपल्याला दिसेल. याचा नुकसान भारतीय मुस्लिमांना भोगावे लागेल. पोलिस प्रशासनाने या दोन्ही घटनेची योग्य रीतीने तपास केल्यास नक्की नगरमध्ये चालले षडयंत्र जनतेसमोर येईल, अशी खात्री एमआयएमचे जिल्हाध्यक्ष डॉ. परवेझ अशरफी यांनी नगरच्या पोलिस अधीक्षक यांना निवेदनाद्वारे व्यक्त केली आहे.

# प्रस्तावित 'मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा' तात्काळ व संपूर्णतः रद्द करण्यात यावा : विश्व हिंदू परिषद

## हिंदू देवस्थानांच्या बाबतीतच हस्तक्षेप व धार्मिक समतेच्या तत्त्वालाही बाधा : जिल्हाधिकारी यांना निवेदन



प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा तात्काळ व संपूर्णतः रद्द करण्यात यावा. या मागणीचे निवेदन अहिल्यानगर जिल्ह्यातील मंदिर, विश्वस्त, पुजारी यांच्या वतीने विश्व हिंदू परिषदेचे मंदिर एवंम अर्चक पुरोहित आयामाच्यावतीने निवासी जिल्हाधिकारी श्री.गिते यांना देण्यात आले आहे.

नगर – प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायद्यामुळे मंदिरांच्या आर्थिक स्रोतांवर गंभीर परिणाम होऊन अनेक धार्मिक आणि सामाजिक उपक्रम बंद पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. हा कायदा हिंदू देवस्थानांच्या बाबतीतच हस्तक्षेप करणारा असून धार्मिक समतेच्या तत्त्वालाही बाधा पोहोचवणारा आहे. संविधानाने दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्य आणि धार्मिक संस्थांच्या व्यवस्थापनाच्या अधिकारांवर हा कायदा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मर्यादा आणणारा आहे.

प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा तात्काळ व संपूर्णतः रद्द करण्यात यावा. या मागणीचे निवेदन अहिल्यानगर जिल्ह्यातील मंदिर, विश्वस्त, पुजारी यांच्या वतीने विश्व हिंदू परिषदेचे मंदिर एवंम अर्चक पुरोहित आयामाच्यावतीने निवासी जिल्हाधिकारी श्री.गिते यांना देण्यात आले आहे. याप्रसंगी विश्व हिंदू परिषद मंदिर एवंम पुरोहित आयामाचे विभाग टोळी सदस्य गजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, तुळजाभवानी माता देवीच्या पलंगाचे मानकरी गणेश पलंगे, श्री.राजापुरे, गोशाळेचे गौतम कराळे, अरुण खिची, दिनेश परदेशी, श्री.दुधाले आदी उपस्थित होते.

या निवेदनात असे नमुद केले आहे की, प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा तात्काळ रद्द करावा. तसेच, सनातन आणि प्रस्थापित हिंदू कायदा यांचे अनुषंगाने देवस्थान जमिनींवर झालेले अतिक्रमण तत्काळ काढून टाकून सदरील जमिनी देवस्थान कडे तत्काळ वर्ग करून एकंदरीतच देवस्थान जमिनीच्या संरक्षण, व्यवस्थापन आणि संवर्धनासाठी तज्ञ समिती नियुक्त करून व्यापक अभ्यासानंतर उपरोक्त उद्येश पूर्ती साठी कायद्याचे प्रारूप तयार करण्याची मागणी केली आहे.

राज्यातील सर्व प्रमुख देवस्थानांचे प्रतिनिधी, धर्माचार्य, कायदेतज्ञ, महसूल तज्ञ आणि सामाजिक संस्थांचा समावेश असलेली स्वतंत्र तज्ञ समिती नियुक्त करण्यात यावी. मंदिरांच्या धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक हितांचा सखोल अभ्यास करून नवीन प्रारूप तयार करण्यात यावे. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी राज्यभरातील देवस्थान, अर्चक, पुजारी आणि हिंदू समाजाशी व्यापक चर्चा करण्यात यावी.

# 'पुस्तकांचे गाव' उपक्रमाचे प्रभावी नियोजन करा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे निर्देश



'पुस्तकांचे गाव' उपक्रमाचे प्रभावी नियोजन करण्यासाठी आयोजिलेल्या बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आदी.

नगर – वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि ग्रामीण भागात ज्ञानाचा प्रसार व्यापक करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या 'पुस्तकांचे गाव' या महत्त्वाकांक्षी योजनेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून उपक्रमाचे सुसूत्र नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात 'पुस्तकांचे गाव–विस्तार' योजनेअंतर्गत जिल्ह्यात 'पुस्तकांचे गाव' उभारण्याबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, तहसीलदार नागेश गायकवाड, जिल्हा ग्रंथालय निरीक्षक रामदास शिंदे, मराठी भाषा समिती सदस्य किशोर मरकड, संजय कळमकर, शशिकांत नजन तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, वाचन संस्कृती ही समाजाच्या बौद्धिक विकासाचा पाया आहे. ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी आणि युवकांना दर्जेदार साहित्य सहज उपलब्ध व्हावे, यासाठी 'पुस्तकांचे गाव' ही संकल्पना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ज्ञान, साहित्य आणि संस्कृतीचा प्रसार अधिक प्रभावीपणे होण्यास मदत होईल.

पुस्तकांचे गाव उभारताना स्थानिक वैशिष्ट्ये, उपलब्ध जागा, वाचन संस्कृतीची परंपरा तसेच पर्यटनविकासाची क्षमता यांचा विचार करावा. हा उपक्रम केवळ पुस्तक विक्री किंवा प्रदर्शनापुरता मर्यादित न ठेवता वाचन प्रेरणा उपक्रम, साहित्यिक कार्यक्रम, ग्रंथदालन, अभ्यासिका आणि सांस्कृतिक उपक्रमांचा समावेश असलेले ज्ञानकेंद्र विकसित करण्यावर भर द्यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीत 'पुस्तकांचे गाव–विस्तार' योजनेच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील संभाव्य ठिकाणे, उपलब्ध सुविधा, आवश्यक पायाभूत व्यवस्था तसेच उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी करण्यात येणाऱ्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला.

# दीपक खराडे यांचे दु:खद निधन



नगर – चिचोंडी पाटील (अ.नगर) येथील रहिवासी दिपक महादेव खराडे (वय ४२) यांचे ५ जून रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील येथील मोतीबाग अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, आई, १ भाऊ, बहीण, आजी, भावजय, मेहूणे, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.


# श्रीमती मालतीबाई साठे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी श्रीमती मालतीबाई माधवराव साठे (वय ६०) यांचे २ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, ४ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. प्रसाद साठे यांच्या त्या मातोश्री होत.

# कलाशिक्षक हबीब मन्यार यांचे अल्प आजाराने निधन



नगर – केडगाव भूषणनगर येथील रहिवासी हबीब मिठुभाई मन्यार (वय ७९) यांचे ५ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. केडगाव येथील शाही नुरी जामा मज्जित कब्रस्तान येथे त्यांचा दफनविधी करण्यात आला.

हिंगणगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या शाळेत त्यांनी कला शिक्षक म्हणून ३८ वर्ष सेवा दिली होती. त्यांना आदर्श कलाशिक्षक म्हणून गौरवण्यात आले होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात योगदान दिले. अत्यंत मनमिळाऊ व्यक्तीमत्व म्हणून ते परिचित होते.

हबीब मन्यार यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना नातवंड असा परिवार आहे. प्रेस फोटोग्राफर समीर मन्यार, अमित मन्यार व अन्वर मन्यार यांचे वडील होत.

# अखेर पोलीस बंदोबस्तात बोल्हेगावमध्ये पावसाळी गटार कामाला प्रारंभ

## राघवेंद्र स्वामी मंदिर परिसरात साचणारे पाणी बंद पाईपद्वारे सोडणार सीना नदीत



बोल्हेगाव येथील राघवेंद्र स्वामी मंदिर परिसरात साचणारे पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु करण्यात आले.

नगर – बोल्हेगाव येथील राघवेंद्र स्वामी मंदिर परिसरात पावसाळ्यात साचणाऱ्या पाण्यामुळे रहिवाशांचे हाल होत होते. पावसाचे पाणी काही नागरिकांच्या थेट घरांत शिरत असल्यामुळे पावसाळ्या या नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महापालिकेने बंदिस्त पाईपद्वारे हे पाणी थेट सीना नदीत सोडण्याचा प्रस्ताव तयार केला होता. मात्र, या लाईनला परिसरातील शेतकऱ्यांनी विरोध केला होता. अखेरीस महापालिकेने संबंधित शेतकऱ्यांना नोटिसा देवून पोलीस बंदोबस्तात या पावसाळी गटार कामाला ५ जून रोजी प्रारंभ केला.

राघवेंद्र स्वामी मंदिर परिसरातील पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी बंदिस्त पाईपलाईन टाकण्याचे काम सुमारे वर्षभरापूर्वी महापालिकेने प्रस्तावित केले होते. मात्र, ही पाईपलाईन शेतकऱ्यांच्या शेतातून जात असल्याने गेल्या वर्षभरापासून या कामाला स्थानिकांकडून विरोध होत होता. संबंधित शेतकऱ्यांची जमीन वर्ग २ ची असल्याने या कामात अडचणी येत होत्या. अखेरीस प्रशासनाने कायदेशीर नोटीस बजावत हे काम हाती घेण्याचा निर्णय घेतला. महापालिका आयुक्त यशवंत डांगे आणि अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली शहर अभियंता मनोज पारखे व कनिष्ठ बांधकाम अभियंता आदित्य बल्लाळ यांच्या नेतृत्वात महापालिकेच्या पथकाने ५ जून रोजी हे काम सुरू केले. दरम्यान हे काम सुरु असताना कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस उपनिरीक्षक राधेश्याम दिनकर यांच्या नेतृत्वात ९ पोलीस कर्मचारी घटनास्थळी तैनात करण्यात आले होते. यामध्ये ६ पुरुष व ३ महिला कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

महापालिकेच्या निधीतून सुमारे १० लाख रुपये खर्चातून हे काम केले जात आहे. यामध्ये ३०० मिमी व्यासाचे आरसीसी पाईप वापरून ही पावसाळी जलवाहिनी टाकली जात आहे. ही पाईपलाईन कातोरे वस्तीकडून येणाऱ्या प्रस्तावित डीपी रोडलगत असून, याद्वारे पाणी थेट सीना नदीपात्रात सोडले जाणार आहे. त्यामुळे बोल्हेगाव येथील गणेश चौक, राघवेंद्र स्वामी मंदिर परिसरात पावसाळ्यात जे पाणी साचत होते, ते साचणार नाही व पावसाळ्यात घरात पाणी शिरण्याच्या समस्येतून नागरिकांची मुक्तता होणार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### का खावा ब्राऊन ब्रेड

आपण रोज नाश्त्याला पांढरा ब्रेड खातो, पण तो आरोग्यासाठी चांगला नाही. पांढरा ब्रेड मैद्यापासून बनतो आणि मैदा तयार करताना गव्हातील पौष्टिक कोंडा व बीजांकुर काढून टाकले जातात. त्यामुळे त्यात फायबर आणि पोषक तत्वे शिल्लक राहत नाहीत. याउलट ब्राऊन ब्रेड पूर्ण गव्हाच्या पिठापासून बनतो, त्यामुळे कोंड्यासह सर्व फायबर त्यात टिकून राहते. फायबरमुळे पचनक्रिया सुधारते, बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही आणि पोट जास्त वेळ भरलेले राहते. पांढरा ब्रेड खाल्लयावर रक्तातील साखर झपाट्याने वाढते, त्यामुळे लवकर भूक लागते आणि मधुमेहाचा धोका वाढतो. पण ब्राऊन ब्रेडचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्याने तो हळूहळू ऊर्जा देतो. याशिवाय ब्राऊन ब्रेडमध्ये व्हिटॅमिन इ, लोह, मॅग्नेशियम आणि झिंक भरपूर प्रमाणात असते जे शरीरासाठी आवश्यक आहे. मैदा पचायला जड असल्याने अनेकांना ॲसिडिटी होते, पण ब्राऊन ब्रेड हलका असतो. वजन कमी करायचे असेल तर ब्राऊन ब्रेड उत्तम कारण तो जास्त वेळ पोट भरलेले ठेवतो. हृदयासाठीही तो चांगला कारण फायबरमुळे वाईट कोलेस्टेरॉल कमी होते. पांढऱ्या ब्रेडमध्ये साखर आणि प्रिझर्व्हेटिव्ह जास्त असतात, पण ब्राऊन ब्रेड नैसर्गिक असतो. त्यामुळे फक्त पोट भरण्यापेक्षा शरीराला ताकद देणारा ब्राऊन ब्रेड निवडा.

## पाककला

### आंबा केशर बर्फी

**साहित्य** : पिकलेल्या हापूस आंब्याचा गर १ कप, खवा / मावा २५० ग्रॅम, साखर ३/४ कप, तूप २ टेबलस्पून, केशर १५२० काड्या २ चमचे, कोमट दुधात भिजवलेले वेलची पूड १/२ चमचा, पिस्ता बदाम काप सजावटीसाठी

**कृती** : केशर कोमट दुधात भिजत ठेवा. आंब्याच्या फोडी मिक्सरमध्ये पाणी न घालता बारीक करून घ्या. कढईत १ चमचा तूप गरम करून आंब्याचा गर मंद आचेवर ४५ मिनिटे परता. पाणी पूर्ण आटवा.त्यात कुस्करलेला खवा घालून सतत ढवळा. खवा वितळला की साखर घाला.मिश्रण घट्ट होऊन कढईच्या कडा सोडेपर्यंत शिजवा. केशर दूध, वेलची पूड आणि १ चमचा तूप घालून मिक्स करून गॅस बंद करा. तूप लावलेल्या ताटात मिश्रण ओतून एकसारखे थापा. वरून पिस्ताबदाम लावा. पूर्ण थंड झाल्यावर वड्या पाडा.

## वास्तू

### सुयोग्य बेडरुमसाठी...

* बेडरूम ही विश्रांतीची जागा आहे. इथली ऊर्जा सकारात्मक असली तर झोप चांगली लागते आणि नातेसंबंधही चांगले राहतात.

* मुख्य बेडरूम घराच्या नैऋत्य कोपऱ्यात असावी. हा कोपरा स्थिरतेचे प्रतीक आहे. लहान मुलांची बेडरूम वायव्य किंवा पश्चिम दिशेला चालेल.

## सौंदर्य

पुरेसे पाणी प्यायल्याने त्वचा आतून ओलसर राहते, तिचा ताण कमी होतो. पाणी हे सगळ्यात स्वस्त अँटी-एजिंग ट्रीटमेंट आहे.

## सल्ला

भाजी जळाल्यास भाजीवर पावाचा किंवा ब्रेडचा एक स्लाइस ठेवून ५ मिनिट झाकून ठेवा. ब्रेड सगळा वास शोषून घेतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. ६ जून २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ कृष्णपक्ष, श्रवण ०६।०३, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २८ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : उत्साहवर्धक दिवस. कामाच्या ठिकाणी नवीन संधी. कुटुंबाशी मनमोकळा संवाद साधाल.

**वृषभ** : आर्थिक बाबतीत सावध रहा. जवळच्या व्यक्तींसोबत वेळ घालवल्याने मन प्रसन्न राहील.

**मिथुन** : बौद्धिक कार्यात यश. नवीन प्रकल्प सुरू करण्यासाठी उत्तम दिवस. मित्रांचे सहकार्य मिळेल. नोकरीत नवीन संधी.

**कर्क** : भावनिक संतुलन महत्त्वाचे. कुटुंबात आनंदी वातावरण. व्यावसायिक निर्णय पुढे ढकला.

**सिंह** : नेतृत्व गुण चमकतील. वरिष्ठांकडून प्रशंसा मिळेल. आरोग्याकडे लक्ष द्या.

**कन्या** : दिवस आवडीप्रमाणे जाईल. धार्मिक कामातून मान वाढेल. पोटाची काळजी घ्यावी लागेल.

**तूळ** : विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मार्ग मोकळे होतील. माहिती तंत्रज्ञान, बँक क्षेत्रात यश मिळेल. मानसिक स्थैर्य जपा.

**वृश्चिक** : नव्या कल्पना सुचतील. जीवनसाथीच्या करिअरमध्ये वळण. आय वाढीचे योग. वडिलांचा सल्ला उपयुक्त.


**धनु** : निर्णयक्षमता भक्कम राहील, पण कोणाच्या भुलवण्याला बळी पडू नका. विद्यार्थ्यांना दिलासा.

**मकर** : राजकारणाशी संबंधित व्यक्तींना मोठे पद मिळण्याचे योग. नवे वाहन खरेदीचे स्वप्न साकार होईल.

**कुंभ** : आनंदाने जगण्याचा मूड. मुलांबरोबर वेळ घालवल्याने ताण हलका होईल. धन व सुख-सुविधांमध्ये वाढ.

**मीन** : खर्चाचे प्रमाण वाढेल. बाहेरील गोष्टींत लक्ष घालू नका. जवळचे नातेवाईक भेटतील.

## शब्दगंध क्र. ७४४५ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द** :- १) मुळीच नसणे ३) अंदाज; अनुमान; कयास; तर्क ७) मोठी गोटी; वरचा भाग; आच्छादन ८) पाण्यात राहणारा एक हिंस्र प्राणी; मकर; नक्र ९) कडक पाठ असलेला एक जलचर ११) मोठा भाऊ; गुंड १२) गुंतागुंत १३) राजाने बोलावलेली किंवा भरवलेली सभा १५) हिस्सा; वाटा १६) या चौसष्ट आहेत; आर्ट १७) गंध; राहणे १८) आईची बहीण २०) स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान - पंडित ++++++ नेहरू २१) दिवा लावण्यासाठीची कापसाची सुरळी; वारा; वायू २२) पूर्वी हे लोक दारू गाळत असत

**उभे शब्द** :- १) अमुक; फलाणा २) एकसारखे बोलणे; बडबड ४) उत्साही; धीराचा; निश्चयाचा; दीर्घोद्योगी; जोशपूर्ण ५) तपास; शोध; ठावठिकाणा ६) टोळीचा प्रमुख १०) अखंड ; न तुटता ११) पती; नवरा; यजमान; स्वामी १४) पायऱ्या असलेली विहीर १५) भावाची बायको १६) सर्कशीतील शरीराच्या विशिष्ट हालचाली; व्यायाम १७) प्रशंसा; शाबासकी; तारीफ १८) स्वामी; यजमान; पती १९) थंड; गार

**शब्दगंध क्र. ७४४४ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. १२३९ चे उत्तर**



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : संघर्षाशिवाय यश नाही आणि कष्टाशिवाय फळ नाही, समुद्रातले मोती हवेत तर खोलवर जावेच लागते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### वेळ म्हणजे नेमके काय? वेळ खरंच सगळीकडे सारखीच असते का?

वेळ म्हणजे फक्त घड्याळातला काटा नाही तर घटना घडण्याचा क्रम आहे. सूर्य उगवला, मावळला आणि पुन्हा उगवला या दोन उगवण्यामधल्या काळाला आपण दिवस म्हणतो. वेळेमुळेच आपल्याला आधी काय घडले आणि नंतर काय घडणार हे समजते. पूर्वी लोक सावली, सूर्य आणि चंद्र यावरून वेळ मोजत होते पण आता आपण अणुघड्याळ वापरतो जे सीझियम अणूच्या कंपनांवरून एक सेकंद ठरवते आणि ते इतके अचूक आहे की कोट्यवधी वर्षांत एक सेकंदाचाही फरक पडत नाही. न्यूटनच्या काळापर्यंत असे मानले जात होते की वेळ ही नदीसारखी असून विश्वात सगळीकडे एकाच गतीने वाहते.

तुमच्यासाठी, माझ्यासाठी, चंद्रावर किंवा मंगळावर वेळ सारखीच असते असे त्याला वाटायचे. पण आईन्स्टाईनने १९०५ साली सापेक्षतावादाचा सिद्धांत मांडून हे सगळे बदलून टाकले. त्याने सांगितले की वेळ निरपेक्ष नसून सापेक्ष आहे म्हणजे तुमचा वेग आणि तुमच्या आजूबाजूचे गुरुत्वाकर्षण यावर वेळेची गती अवलंबून असते. तुम्ही जर प्रकाशाच्या वेगाजवळ प्रवास करत असाल तर तुमच्यासाठी वेळ हळू जाईल. यालाच टाईम डायलेनशन म्हणतात.

समजा जुळी मुले आहेत आणि त्यातला एक प्रकाशाच्या वेगाने अंतराळात दहा वर्षे फिरून आला तर पृथ्वीवर राहिलेल्या भावाचे वय दहा वर्षांनी वाढेल पण अंतराळात गेलेल्या भावाचे फक्त चारच वर्षे वाढतील.

वेगाशिवाय गुरुत्वाकर्षणाचाही वेळेवर परिणाम होतो. जिथे गुरुत्वाकर्षण जास्त तिथे वेळ हळू जाते. डोंगरावरच्या घड्याळापेक्षा समुद्रसपाटीवरचे घड्याळ थोडे स्लो चालते कारण पृथ्वीच्या जवळ गुरुत्वाकर्षण जास्त असते. याचे सगळ्यात चांगले उदाहरण म्हणजे जीपीएस. जीपीएसचे उपग्रह पृथ्वीपासून खूप लांब आहेत तिथे गुरुत्वाकर्षण कमी असल्याने त्यांची घड्याळे रोज पृथ्वीच्या तुलनेत फास्ट होतात. जर शास्त्रज्ञांनी हा फरक दुरुस्त केला नाही तर तुमच्या मोबाईलचे लोकेशन दहा किलोमीटरपर्यंत चुकू शकते.

ब्लॅक होलजवळ तर गुरुत्वाकर्षण इतके प्रचंड असते की तिथला एक तास म्हणजे पृथ्वीवरची अनेक वर्षे असू शकतात. इंटरस्टेलर सिनेमात हेच दाखवले होते.

याचा अर्थ आपला आत्ता आणि सूर्यावरचा आत्ता वेगळा असतो कारण सूर्याचा प्रकाश आपल्यापर्यंत पोहोचायला आठ मिनिटे लागतात. आईन्स्टाईनने सांगितले की आपले विश्व तीन मितींचे नसून चार मितींचे आहे लांबी रुंदी उंची आणि चौथी मिती म्हणजे वेळ. यालाच स्पेस टाइम म्हणतात. मोठे ग्रह आणि तारे या स्पेस टाइमच्या चादरीला वाकवतात आणि त्यामुळेच वेळ हळू किंवा फास्ट होते. त्यामुळे थोडक्यात वेळ सगळीकडे सारखी नसते. पण पृथ्वीवर आपल्या रोजच्या आयुष्यात वेग आणि गुरुत्वाकर्षणातील फरक इतका कमी असतो की आपल्याला तो जाणवतच नाही म्हणून आपल्याला सगळ्यांसाठी वेळ सारखी वाटते.

## वेळेचा सदुपयोग

एकदा एक म्हातारा शेतकरी आपल्या शेतात काम करत होता. उन्हाने काहिली झाली होती. तेवढ्यात एक तरुण मुलगा तिथून जात होता. तो म्हाताऱ्याला म्हणाला, आजोबा, इतक्या उन्हात काम करताय? थोडा आराम करा. आजचा दिवस फुकट घालवा. म्हातारा हसला आणि म्हणाला, बाळा, माझ्या आयुष्यात एकही दिवस वाया गेलेला नाही. मुलगा आश्चर्याने म्हणाला, पण कसे? कधीतरी आजारपण, पाऊस, सणवार येतोच ना?

म्हातारा म्हणाला, जेव्हा मी शेतात काम करू शकतो तेव्हा मी मन लावून काम करतो. त्यामुळे धान्य पिकते आणि चार लोकांचे पोट भरते. जेव्हा पाऊस पडतो आणि शेतात जाता येत नाही तेव्हा मी घरी बसून माझ्या नातवंडांना गोष्टी सांगतो, त्यांना अक्षरओळख करून देतो. ज्ञान वाटतो. जेव्हा मी आजारी पडतो तेव्हा शांतपणे झोपून शरीराला आराम देतो, विचार करतो.

जेव्हा सण असतो तेव्हा कुटुंबासोबत आनंद साजरा करतो, नाती घट्ट करतो. दिवस वाया जातो तेव्हा जेव्हा आपण काहीच करत नाही - ना काम, ना विश्रांती, ना शिकणे, ना आनंद. मी प्रत्येक क्षणाचा उपयोग करतो. एकतर शरीरासाठी, किंवा मनासाठी, किंवा नात्यांसाठी. म्हणून माझा एकही दिवस फुकट गेलेला नाही. हे ऐकून तो तरुण विचारात पडला. त्याला समजले की वेळेचा योग्य वापर म्हणजेच आयुष्य जगणे.

**बोध** : दिवस मोठा किंवा लहान नसतो, आपण तो कसा वापरतो त्यावर तो 'वाया गेला' की 'सत्कारणी लागला' हे ठरते. काम, विश्रांती, शिक्षण आणि आनंद - यातला एकतरी हेतू साध्य झाला की दिवस सार्थकी लागला.



## जीवन का अमृत (भाग १)

अधिक जागृत करावा असा उद्देश मनी बाळगावा! आमच्या आत्म्याला अधिक जागृत केल्यावर आम्ही आपल्या मन आणि इंद्रियावर ताबा मिळवू शकतो.

ध्यान धारणेचा (साधनेचा) फायदा, आमच्या आत्मिक गुणांची ओळख करुन घेण्यात होतो, आम्हाला देहबुद्धीच्या वर येण्याची दिशा दाखवतो. आम्ही आमच्या आत्मशक्तीला विसरून गेलो आहोत. मन, इंद्रिये, शरीर तसेच ह्या जगाच्या बंधनाने आमचा आत्मा भुलला गेला आहे. तेव्हा आम्ही देहबुद्धीच्या वर यायला हवे. जेव्हा आमचा आत्मा जागृत असेल, तेव्हाच त्याच्या प्रेम, विवेक, धैर्य अमरत्व आनंद इत्यादी गुणांनी आम्ही आमच्या जीवनास एक नवे रुप देऊ शकतो.

बहुतेक लोक ह्या जगात येतात व ते सोडूनही जातात. पण त्यांना त्यांचा आत्मा व त्याची शक्ती ह्याचा अनुभव येत नाही. जीवनाच्या कोणा एका वळणावर आम्ही जरुर विचार करावा की, आत्मा

### ध्येयपूर्तीच्या दिशेने

काय आहे? परमात्मा काय आहे? आमच्या जगण्याचा हेतू काय आहे? आपल्या जीवनाचे ध्येय जाणून घेण्यासाठी लोक वेगवेगळ्या प्रकारे आत्म शोध घेतात. काही लोक धर्मग्रंथ वाचून तर काही लोक तीर्थक्षेत्रावर जाऊन ध्येयपूर्तीचा शोध घेतात. काही लोक धर्मांतर करून अन्य धर्मात त्याचे उत्तर शोधतात. कोणी कोणताही मार्ग स्विकारो, कोणत्याही पध्दतीचा अवलंब करो, जीवनातील ह्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी एकच मार्ग निवडावयास हवा आणि तो म्हणजे अध्यात्म मार्ग. ह्या मार्गानेच जाऊन आम्ही आत्मबोध म्हणजे आपले खरे स्वरुप शोधावे. बहुतेक लोक आत्मानुभव न घेताच वा आपल्या जीवनाचे उद्दीष्ट काय आहे हे न जाणताच आपले आयुष्य घालवितात. बरेच जण दुःख प्राप्त झाले वा मृत्यु जवळ आला म्हणजे हा शोध घेण्याचा प्रयत्न करतात. परंतु त्यांना समाधानकारक उत्तर मिळत नाही. दुःख संपले तर हा शोधही ते सोडून देतात. परंतु जे लोक जीवन रहस्य शोधून काढण्याची तीव्र लालसा धरतात ते रहस्याचा शोध घेऊ शकतात. आमच्या सुदैवाने आजही ह्या जगात अध्यात्मिक परिपूर्णता प्राप्त केलेले

लोक अस्तित्त्वात आहेत. ते आम्हाला मार्गदर्शन करु शकतात. जर आम्ही इतिहासाची पाने चाळली तर आम्हाला दिसेल की, प्रत्येक कालखंडात आत्मानुभव व परमात्मादर्शन घेतलेले लोक जन्माला आले आहेत. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकावरून आम्ही त्यांचे अनुभव समजावून घेऊ शकतो. अशा काही महात्म्यांच्या शिकवणूकीच्या आधारावरच वेगवेगळ्या धर्मांची स्थापना झाली आहे. असेही काही महापुरुष होऊन गेले की, त्यांनी आत्मज्ञान मिळवले पण लेखी पुरावा ठेवला नाही. कारण त्यांनी कोणताही धर्म स्थापन केला नाही वा कोणताही ग्रंथ लिहीला नाही. काही इतर लोकांनी, त्यांच्याबाबत जे काही लिहिले आहे, त्यावरूनच आम्ही त्यांना ओळखतो. एवढे मात्र खरे की, अशा महापुरुषा आम्हाला आत्म ज्ञान देण्याचे सामर्थ्य असते.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

तेव्हाच आपण त्या व्यक्तीचे संस्कार स्वीकारू आणि ती कशीही बागत असली तरी प्रेमाची मूळ ऊर्जा तिला देऊ. भूमिकेची जाणीव अपेक्षा निर्माण करते आणि आत्म्याची जाणीव स्वीकार.

लोक आपली आर्थिक पिळवणूक करू शकतात, शारीरिक इजा पोहोचवू शकतात किंवा अपशब्द वापरू शकतात. पण आपण कोणत्या भावना निर्माण करतो ह्याची निवड संपूर्णपणे आपली आहे. आपल्या मनात प्रवेश करून कोणीच आपले विचार निर्माण करू शकत नाही. भावनिक शोषण किंवा शांततापूर्ण स्वीकार- ही आपली निवड आहे.

आपल्या विशुद्ध स्वरूपातच तुम्ही इतरांना काही देऊ शकता

सुरेश ओबेरॉय : मी मी प्रेम आहे, मी शांती आहे हा मंत्र मी नीट लक्षात ठेवला आहे. पण जेव्हा

### संस्कार

इतरांमध्ये मला प्रेम आणि शांती दिसत नाही तेव्हा माझे जुने संस्कार संपूर्ण ताकदीनिशी समोर येतात. आणि मग मी त्यांच्याकडे आध्यात्मिक दृष्टिकोनातून बघू शकत नाही. मला नोकर हा नोकर दिसतो, मालक हा मालक, मित्र हा मित्र आणि चोर हा चोर दिसतो. यांच्यापैकी कोणीच मला आत्मा म्हणून दिसत नाही.

शिवानीदीदी : लोकांना त्यांच्या भूमिकेतून ओळखणं हा गेली अनेक जन्म खोलवर रुजलेला संस्कार आहे. त्यामुळे तो एका दिवसात बदलू शकत नाही. सर्वप्रथम, मी एक आत्मा आहे, हे लक्षात ठेवलं पाहिजे आणि मग इतरांकडे आत्मा म्हणून बघितलं पाहिजे.

ब्रह्माकुमारीजमध्ये सर्वांत आधी हेच ज्ञान दिलं जातं. जुने संस्कार वारंवार वर येतात. पण आपण स्वतःला या शहाणपणाची आठवण सतत करून दिली पाहिजे. जेव्हा आपण म्हणतो, मी मालक आहे आणि हा नोकर आहे. तेव्हा तो एका भूमिकेचा दुसऱ्या भूमिकेशी असलेला संबंध असतो. आत्म्याचा आत्म्याशी असलेला नाही. आपण आयुष्यात अनेक भूमिका निभावतो. उदाहरणार्थ, एखाद्याचे मित्र, नवरा, वडील आणि कुणाचेतरी मालक. आपण कित्येक जन्म भूमिका, पदं आणि संबंध यांच्याशी संपर्क साधत आलो आहोत. ज्यांमुळे आपली विचारपद्धती आणि वर्तणूक बदलली आहे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पोरीचा बाप पोराला : माझ्या मुलीशी लग्न करायचं असेल तर महिन्याला १ लाख कमवावे लागतील.

पोरगा : मग तुमच्या मुलीला माझ्याकडे नोकरीला ठेवता का? तिला पण महिना ५० हजार देईन.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताचे संविधान कधी लागू झाले?

\- २६ जानेवारी १९५० रोजी

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

## घोसाळे

औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार :

घोसाळी ही अग्निदीपक, शीतल, मधुर गुणात्मक व कफकारक असतात.

आधुनिक शास्त्रानुसार :

घोसाळ्यामध्ये लोह, कॅल्शिअम, फॉस्फरस, आर्द्रता 'ब' व 'क' जीवनसत्त्व, पिष्टमय व तंतुमय पदार्थ, कॅरोटीन, रिबोफ्लेविन, नायसिन, प्रथिने, खनिजे भरपूर प्रमाणात असतात.

उपयोग : १) घोसाळ्यामध्ये कमी उष्मांक असल्याने लठ्ठपणा असणाऱ्या व्यक्तींनी आहारामध्ये घोसाळ्याची भाजी भरपूर वापरावी. यामुळे पोट भरल्याची भावनाही होते व वजन आटोक्यात राहते. रक्तदाब, हाय कोलेस्टेरॉल, हृदयरोग, मधुमेह हे विकार असणाऱ्या रुग्णांनी आहारामध्ये घोसाळे आवर्जून वापरावे.

२) कारण उष्मांक कमी व तंतुयुक्त पदार्थ जास्त असल्यामुळे वरील सर्व आजार आटोक्यात राहतात. म्हणून घोसाळ्याचा आयुर्वेदामध्ये पथ्यकर भाजी म्हणून उल्लेख केला जातो.

३) अंगाचा दाह होत असेल, तर घोसाळ्याचा रस त्वचेला लावावा. यामुळे त्वचेला थंडावा निर्माण होऊन दाह कमी होतो.

४) अपचन, आम्लपित्त या विकारांमध्ये घोसाळ्याची भाजी खावी. घोसाळे अग्निदीपक असल्यामुळे वरील विकार दूर होतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# अहिल्यानगर लीग फुटबॉल स्पर्धेत ‘फिरोदिया शिवाजियन्स’ विजयी

### सलग ८ सामने जिंकून खेळात वर्चस्व; सुमन फुटबॉल क्लब ठरले उपविजयी

नगर – अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन (एडीएफए) आयोजित अहिल्यानगर लीग २०२५–२६ स्पर्धेचा समारोप चुरशीच्या अंतिम सामन्याने झाला. भुईकोट किल्ला मैदान येथे अंतिम सुपर लीग सामना फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब विरुध्द सुमन फुटबॉल क्लब यांच्यात झाला. अत्यंत रंगतदार झालेल्या या सामन्यात फिरोदिया शिवाजियन्स संघाने सुमन फुटबॉल क्लबवर वर ३–२ गोलने विजय मिळवत विजेतेपद पटकावले.



अहिल्यानगर लीग २०२५–२६ फुटबॉल स्पर्धेत विजयी झालेला फिरोदिया शिवाजियन्स संघ.

फिरोदिया शिवाजियन्स संघाने संपूर्ण स्पर्धेत कामगिरी करत सलग ८ सामने जिंकले तसेच लीग आणि सुपर लीगमध्ये पूर्ण गुण मिळवत अजिंक्यपद संपादन केले. फिरोदिया शिवाजियन्स कडून अभय साळवे याने १० व्या मिनिटाला पहिले गोल केले. त्यानंतर हिमांशू चव्हाण याने २६ व्या मिनिटाला पेनल्टीवर गोल करत आघाडी वाढवली. सुमन फुटबॉल क्लब कडून अविनाश शिंदे याने २९ व्या मिनिटाला पेनल्टीवर गोल करत फरक कमी केला. दुसऱ्या हाफमध्ये अभय साळवे याने ४५ व्या मिनिटाला पुन्हा गोल करत संघाची आघाडी मजबूत केली. अखेरीस अविनाश शिंदे याने ७० व्या मिनिटाला गोल करत सामना रंगतदार केला.

या लीग स्पर्धेत १२ संघांचा सहभाग होता. सुपर लीगमध्ये फिरोदिया शिवाजियन्स, सुमन फुटबॉल क्लब, बाटा फुटबॉल क्लब आणि गुलमोहर फुटबॉल क्लब या चार संघांनी प्रवेश केला. सुपर लीगमध्ये एकूण ६ सामने खेळविण्यात आले. अंतिम सुपर लीग क्रमवारीत प्रथम– फिरोदिया शिवाजियन्स, द्वितीय– सुमन एंटरप्रायझेस, तृतीय– बाटा फुटबॉल क्लब आणि चतुर्थ क्रमांकावर गुलमोहर फुटबॉल क्लब राहिले.

बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासनाचे पुणे येथील औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाचे उपसंचालक स्वप्नील देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

देशमुख म्हणाले की, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन मागील ५४ वर्षापासून शहरात फुटबॉल खेळ रुजवून खेळाडू घडवित आहे. या गौरवास्पद कामगिरीने आज फुटबॉलचे उत्कृष्ट खेळाडू घडत आहे. खेळात विजय–पराभव महत्त्वाचा नसून खेळाडूवृत्ती महत्त्वाची असते. खेळातून नागरिकांमध्ये खेळाडूवृत्ती निर्माण होवून चांगले नागरिक घडत असल्याचे त्यांनी सांगितले.


स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी मानद सचिव रोनप फर्नांडिस, असोसिएशनचे ज्येष्ठ व आधारस्तंभ रिशपालसिंग परमार, संयुक्त सचिव व्हिक्टर जोसेफ, कार्यकारिणी सदस्य राजू पाटोळे, उपाध्यक्ष खालिद सय्यद, संयुक्त सचिव प्रदीप जाधव, खजिनदार तपन परमार आणि जेव्हिअर स्वामी यांचे विशेष योगदान लाभले. स्पर्धेच्या आयोजनासाठी अभय साळवे, अभिषेक सोनवणे आणि राजेश अँथनी यांनी विशेष परिश्रम घेतले.

असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांनी सहभागी संघ, खेळाडू, पंच, आयोजक व फुटबॉलप्रेमींचे अभिनंदन केले. स्पर्धेत उत्कृष्ट पंचगिरी केल्याबद्दल जिल्हा फुटबॉल असोसिएशन रेफरी पॅनेलचेही कौतुक करण्यात आले. पाहुण्यांचा परिचय प्रसाद पाटोळे यांनी करून दिला. कार्यकारिणी सदस्या पल्लवी सैदाणे यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

### ज्ञान सहज देता यावे




असे तैत्तरीयोपनिषदात सूत्र आहे. स्वतःची उन्नती करून घ्या. स्वत:बरोबर समाजाला प्रगत करा. पण त्यासाठी स्वाध्याय आणि प्रवचन आवश्यक. स्वतः वाचन, मनन आणि चिंतन करावे. त्याचे जे सार निघेल ते दुसऱ्याला सांगावे. मग ज्ञान पक्के होते. समाजाला उपयुक्त ठरते.

शिक्षकाने स्वतः ज्ञानी असावे. काही असतात असे अभ्यासू, ज्ञानी; पण तेवढ्याने कसे भागेल? 'संक्रान्ति' म्हणजे आपला अभ्यास, आपले ज्ञान दुसऱ्याला सहज देणे. ते सहज जमले पाहिजे. काहींना शिकवणे उत्तम जमते. स्वत:चा अभ्यास आणि उत्तम शिकविणे हीच उत्तम शिक्षकाची लक्षणे.

शिक्षणशास्त्राचा अभ्यासक्रम आखताना, शिक्षकांना पदव्या देताना, स्वाध्याय व प्रवचन यांचा विचार केला पाहिजे.

आपला विषय, आपल्याला शिकवायचे ते, ज्ञानाच्या कसोटीवर घासून घ्यावे. अग्नीवर लोणी कढवतात तसे. अर्थात हे ज्ञान आणि आपला विषय यांचा संबंध विवेकाने साधावा. विषयानुरूप व विषय मूलग्राही रूपात समजावून सांगता येईल तसे व त्या प्रमाणात ज्ञान द्यावे. मग होते प्रवचन उत्तम. वर्गातील व्याख्यान प्रभावी; पण त्या अभावी शिक्षणाचा होतो खेळखंडोबा. प्रश्नाधारित शिक्षणपद्धती कुचकामाची. स्वाध्याय व प्रवचन विद्यार्थ्यांना हवे. नुसत्या प्रश्नांची उत्तरे तपासून पदव्यांची खैरात करणे, हा शिक्षणाघात होय.

मी एकदा एका महाविद्यालयात गेलो. प्राचार्यांनी एका विद्यार्थ्याला माझ्यासमोर उभे केले. हा महाविद्यालयाचा उत्तम विद्यार्थी. अर्थशास्त्रात प्रवीण. प्रावीण्य मिळवलं यानं बी. ए.च्या परीक्षेमध्ये अर्थशास्त्र विषयात. मी त्याचे अभिनंदन केले; पण प्राचार्यांचे मागणे वेगळे होते. ते म्हणाले, याला तुम्ही काही प्रश्न विचारा. परीक्षेत प्रश्नांची उत्तरे झकास लिहितो. आग्रहच झाला. मी विचारले, उत्पादन वाढले, की किमती कमी होतात. मग धान्य खूप पिकलं तरी त्याचे आज भाव कमी का होत नाहीत? विद्यार्थी म्हणाला, हा 'उत्पादन मूल्यांक' याचा प्रश्न आहे. त्याचं उत्तर मला येत नाही. कारण मी तो अभ्यासलेला नाही. हा प्रश्न गेल्या वर्षीच येऊन गेला, म्हणून यंदा सोडून दिला हो मी म्हटले, तुझ्या अर्थशास्त्राच्या पुस्तकात तर हा सिद्धान्त असेल; आण ते पुस्तक.' ते पुस्तक तीन–तीनदा चाळले; पण त्या सिद्धान्ताची पाने सापडेनात. गतवर्षी हा सिद्धान्त परीक्षेत अपेक्षित होता म्हणून पुस्तकातली तेवढी पाने गायब झाली होती.

इकडे शिक्षक म्हणतात, 'आजकाल विद्यार्थीच चांगले मिळत नाहीत. शिकवायला उत्साह येत नाही.' पण म्हणून का शिक्षकांनी शिकवणे सोडायचे? एखादा उत्तम विद्यार्थी निघेलच. प्रत्येक शिंपल्यातल्या जलबिंदूचा मोती होत नाही, म्हणून का स्वातीच्या जलधारांनी बरसायचेच नाही?

**– किशोर गांधी**

# लाँग मार्चच्या नियोजनासाठी ७ जून रोजी बैठक

### समस्त आंबेडकरी समाज बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन : सुरेश बनसोडे



नगर – अनुसूचित जातीतील अन्यायकारक उपवर्गीकरण रद्द करण्याच्या प्रमुख मागणीसाठी बीड ते मंत्रालय, मुंबई दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या लाँग मार्चच्या यशस्वी नियोजनासाठी ७ जून रोजी सकाळी १०.३० वाजता तारकपूर बसस्थानक शेजारील हॉटेल व्ही स्टार येथे कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीस लाँग मार्चचे प्रमुख संयोजक सिद्धार्थ शिनगारे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील प्रमुख कार्यकर्ते, विहार समितीचे सदस्य, सामाजिक, धार्मिक व राजकीय संघटनांचे पदाधिकारी तसेच भीमसैनिक उपस्थित राहणार आहेत.

बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणारे सुरेश बनसोडे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील समस्त आंबेडकरी समाजबांधव, कार्यकर्ते व भीमसैनिकांनी या बैठकीस उपस्थित राहून उपवर्गीकरणाविरोधातील लढ्यास बळ द्यावे, असे आवाहन केले आहे. तसेच आगामी लाँग मार्चच्या नियोजनाबाबत चर्चा होणार असल्याने सर्वांनी वेळेत उपस्थित राहून आपल्या सूचना व मते मांडावीत, असेही त्यांनी नमूद केले.

या बैठकीत लाँग मार्चची रूपरेषा, संघटनात्मक तयारी आणि विविध स्तरांवरील जनजागृती अभियानाबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

# कॉकपिट टू कादंबरी! कॅप्टन नीलम यांच्या अष्टपैलू प्रवासाचा गौरव

### लोहार यूथ फाउंडेशनतर्फे मानपत्र देऊन विशेष सत्कार

नगर – अहिल्यानगर लोहार यूथ फाउंडेशन (एलवायएफ) वाचनकट्ट्याच्या वतीने एअर इंडियाच्या वैमानिक, लेखिका व मार्गदर्शक कॅप्टन नीलम इंगळे–लोबो, बोईंग–७७७ चे कमांडर कॅप्टन रॉबिन लोबो या दाम्पत्याला मानपत्र देऊन गौरविण्यात आले.


अहिल्यानगर लोहार यूथ फाउंडेशन (एलवायएफ) वाचनकट्याच्या वतीने एअर इंडियाच्या वैमानिक, लेखिका व मार्गदर्शक कॅप्टन नीलम इंगळे–लोबो, बोईंग–७७७ चे कमांडर कॅप्टन रॉबिन लोबो या दाम्पत्याला मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

एका कार्यक्रमानिमित्त कॅप्टन नीलम इंगळे लोबो व मुख्य वैमानिक रॉबिन लोगो हे अहिल्यानगरमध्ये आले होते, त्यावेळी हा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी उद्योजक विनायक गाडेकर, सावित्री हिवाळे आदी उपस्थित होते.

घरात विमानचालनाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना, मूळच्या खर्डा (ता. जामखेड) व जन्म कडा (बीड) येथील असलेल्या नीलम यांनी वयाच्या २२ व्या वर्षी एअर इंडियामध्ये वैमानिक म्हणून प्रवेश मिळवला. आज त्या अत्याधुनिक एअरबस ए–३५० विमानावर 'लाईन ट्रेनिंग कॅप्टन' म्हणून कार्यरत आहेत. कोविड काळात 'मिशन वंदे भारत' अंतर्गत त्यांनी परदेशातील भारतीयांना सुरक्षित मायदेशी आणण्याचे कौतुकास्पद कार्य केले.

ढोर कादंबरीचे लेखक प्रा. भगवान इंगळे व प्रा. आशा इंगळे यांची कन्या असलेल्या कॅप्टन नीलम यांनी कॉकपिटमधील तांत्रिक अचूकतेसोबतच साहित्याची कोमलताही जपली आहे. त्यांचे 'नभांगण' हे पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहे. जागतिक मराठी अकादमीच्या 'शोध मराठी मनाचा' आणि नाशिकच्या वसंत व्याख्यानमालेत त्यांनी आपल्या व्याख्यानातून वेगळी छाप पाडली आहे.

नव्हती घराण्याला विमानचालनाची पार्श्वभूमी, तरी कष्टाने जिंकली आपण आकाशाची भूमी... अशा शब्दांत मानपत्राद्वारे त्यांच्या बहुआयामी कर्तृत्वाचा आणि कौटुंबिक समतोलाचा गौरव करण्यात आला. विज्ञानाची दृष्टी आणि साहित्याची छाया जपणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व तरुण पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे एलवायएफ वाचनकट्टाचे विनायक गाडेकर यांनी सांगितले.


एकता फाऊंडेशनच्या वतीने एस.टी. महामंडळाच्या प्रवासासाठी स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये सहभागी झालेले नागरिक.

# एस.टी. प्रवास सवलतींसाठी स्मार्ट कार्ड नोंदणी

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथे एकता फाऊंडेशनच्या वतीने ग्रामस्थांच्या सोयीसाठी एस.टी. महामंडळाच्या प्रवासासाठी आवश्यक असलेल्या स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच विविध घटकांतील नागरिकांचा प्रतिसाद लाभला. ग्रामपंचायत कार्यालयासमोर असलेल्या नवनाथ मंदिराच्या सभामंडपात हे शिबिर पार पडले. ग्रामीण भागातील नागरिकांना एसटीच्या योजनांचा लाभ सहजपणे मिळावा आणि प्रवासासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी दूरवर जावे लागू नये, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिरादरम्यान महिलांनी तसेच ज्येष्ठ नागरिकांनी उपस्थित राहून स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली. या कार्डच्या माध्यमातून महिलांना एस.टी. प्रवासात ५० टक्के सवलतीचा लाभ मिळणार असून ज्येष्ठ महिला व पुरुषांनाही अर्ध्या तिकिटाची सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच वयोवृद्ध नागरिकांना शासनाच्या धोरणानुसार मोफत प्रवासाचा लाभ घेण्यासाठीही हे स्मार्ट कार्ड उपयुक्त ठरणार आहे.


या प्रसंगी निमगाव वाघा विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन तथा एकता फाऊंडेशनचे अध्यक्ष अतुल फलके, बाबासाहेब जगदाळे, भाऊसाहेब (पिंटू) जाधव, अजय ठाणगे, ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, सुधीर येणारे, सुनील कापसे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. अतुल फलके म्हणाले की, ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या विविध सवलती आणि सुविधा सहज उपलब्ध करून देण्यासाठी एकता फाऊंडेशनच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येतात. शासनाच्या विविध योजनांचा लाभ ग्रामीण भागातील प्रत्येक पात्र व्यक्तीपर्यंत पोहोचला पाहिजे, हा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. अनेक वेळा आवश्यक कागदपत्रे, माहितीचा अभाव किंवा प्रवासाची अडचण यामुळे नागरिकांना या सुविधांचा लाभ घेता येत नाही. हीच अडचण दूर करण्यासाठी एकता फाऊंडेशनने हा उपक्रम राबविल्याचे त्यांनी सांगितले.

स्मार्ट कार्ड हे केवळ एक कार्ड नसून नागरिकांच्या आर्थिक बचतीचे आणि सुलभ प्रवासाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. महिलांना अर्ध्या तिकिटाची सुविधा, ज्येष्ठ नागरिकांना विशेष सवलती आणि वयोवृद्धांना मोफत प्रवासाचा लाभ मिळण्यासाठी हे कार्ड अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. निमगाव वाघा विविध कार्यकारी सेवा सोसायटी, ग्रामपंचायत तसेच सर्व सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी झाला.

# गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात अधिक मासनिमित्त मोगरा महोत्सव उत्साहात

नगर – सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात अधिक मासानिमित्त मोगरा महोत्सव साजरा करण्यात आला. गेल्या तीन आठवड्यापासून श्री स्वामी समर्थ मंदिरात अधिक मासामुळे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत होते. नित्य नियमाने रुद्राभिषेक, पोथी वाचन विष्णुयाग संपन्न झाले.

शुक्रवारी सकाळी विजय पानमळकर या भाविकांनी मोगरा फुलाच्या सजावटीने श्री स्वामी समर्थ मूर्तीचे सुशोभीकरण केले या सेवेमुळे स्वामी भक्तांनी कौतुक केले. या मोगरा महोत्सवामुळे संपूर्ण मंदिरात मोगऱ्याच्या सुगंधाने वातावरण दरवळले होता. स्वामीभक्त सुखावले होते.


सावेडी उपनगरात गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात अधिक मासानिमित्त मोगरा महोत्सव साजरा करण्यात आले. मूर्ती जवळ आकर्षक सजावटीमुळे भाविक सुखावले होते. (छाया – विजय मते)


'एआय'च्या गाण्यांमधून जनगणनेची जनजागृती मोहिमेला नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे.

# 'एआय'च्या गाण्यांमधून जनगणनेची जनजागृती

### डॉ.अमोल बागुल यांच्या गीतांना नागरिकांचा प्रतिसाद

नगर – प्रधान जनगणना अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे यांच्या निर्देशानुसार जनगणना २०२७ च्या जनजागृती मोहिमेला नवे आणि आधुनिक स्वरूप देत प्रगणक तथा जनगणना ब्रँड अँबेसिडर कवी डॉ. अमोल बागुल यांनी मराठी भाषेत जनगणनेवरील प्रेरणादायी गीतांचे लेखन करत कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) आणि चॅट जीपीटीच्या सहाय्याने या गीतांना सुरेल संगीत, आकर्षक ताल, लय आणि आधुनिक ध्वनिमुद्रणाची जोड देऊन गाणी तयार केली आहेत.

आले जनगणनेचे पर्व, सज्ज अहिल्यानगर सर्व, स्वगणना करूया चला, पावसातली जनगणना यांसारख्या गीतांसह सुमारे १० गाणी तयार करण्यात आली असून जनगणनेचा संदेश घराघरांत पोहोचविण्यासाठी विशेष रिंगटोन, जिंगल्स आणि ऑडिओ संदेश देखील विकसित केले आहेत, ही गाणी विविध रेडिओ, एफएम केंद्रे तसेच सोशल मीडियावरील विविध प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत असून नागरिकांकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या गीतांच्या किंवा आर कोड विमोचनाप्रसंगी आयुक्त यशवंत डांगे यांनी नमूद केले की, संगीताच्या माध्यमातून जनगणनेचा संदेश प्रभावीपणे पोहोचत असल्याने नागरिकांमध्ये जनगणनेविषयी जागरूकता वाढत आहे. परिणामी, प्रगणकांना अचूक माहिती संकलित करण्यासाठी अधिक सहकार्य मिळत असल्याचे दिसून येत आहे. जनगणना जनजागृतीसाठी तंत्रज्ञान, साहित्य आणि संगीत यांचा संगम घडवून आणणारा हा उपक्रम राज्यात आदर्शवत ठरत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

यासाठी डॉ.बागुल यांना नागेंद्र मुतकेकर (अतिरिक्त आयुक्त), मेहेर लहारे (सहाय्यक आयुक्त), शहाजान तडवी (प्र.उपायुक्त), राकेश कोतकर (जनगणना विभाग प्रमुख) तसेच बाळासाहेब पवार (प्रभाग अधिकारी), रफिक देशमुख, मास्टर ट्रेनर प्रा.संतोष देशमुख, पर्यवेक्षिका अलका दहातोंडे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. या गाण्यांची लिंक ९५९५५४५५५५ या व्हाट्सअप क्रमांकावर मिळू शकेल.

# शिव–पाणंद शेतरस्त्यांच्या प्रलंबित प्रकरणांवर मंत्रालयात पुरावे सादर

### 'मिशन झिरो पेंडन्सी'ची मागणी; मंत्रालयात शेकडो पुरावे सादर, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी २३ कलमी निवेदन

नगर – राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या हक्काच्या शेतरस्त्यांचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव–पाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे २३ कलमी मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. यावेळी राज्यभरातील शेकडो प्रलंबित शेतरस्ता प्रकरणांचे पुरावे मंत्रालयात सादर करून मिशन झिरो पेंडन्सी अभियान राबविण्याची मागणी करण्यात आली.


राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या हक्काच्या शेतरस्त्यांचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव–पाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे २३ कलमी मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. यावेळी राज्यभरातील शेकडो प्रलंबित शेतरस्ता प्रकरणांचे पुरावे मंत्रालयात सादर करून मिशन झिरो पेंडन्सी अभियान राबविण्याची मागणी करण्यात आली.

शेतरस्ता हा शेतकऱ्यांचा मूलभूत हक्क असून शेती उत्पादन, सिंचन व्यवस्था, कृषी यंत्रसामुग्रीची ने–आण तसेच शेतीमाल बाजारपेठेत पोहोचविण्यासाठी अतिक्रमणमुक्त आणि दर्जेदार रस्ते अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासनाने शेतरस्ते अडविणाऱ्यांविरोधात कठोर धोरण स्वीकारले असले तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक अडचणी येत असल्याने हजारो प्रकरणे अद्याप प्रलंबित असल्याचे चळवळीच्या पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले.

निवेदनामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ५(२) व १४३ मध्ये सुधारणा, शेतरस्ते खुले करण्यासाठी विनाशुल्क पोलिस बंदोबस्त, प्रलंबित प्रकरणांचा कालबद्ध निपटारा, मोजणी व अतिक्रमण निर्मूलनासाठी स्वतंत्र निधी, शासकीय यंत्रसामुग्रीची उपलब्धता, डिजिटल पुराव्यांचा वापर, पारदर्शक कार्यपद्धती, स्वतंत्र नियंत्रण कक्ष, ग्रामस्तरीय शेतरस्ता समित्या तसेच शिव–पाणंद रस्त्यांसाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्यासह विविध महत्त्वपूर्ण मागण्या करण्यात आल्या आहेत.

राज्यातील महसूल नकाशावरील सर्व अधिकृत शेतरस्ते शंभर टक्के अतिक्रमणमुक्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, गावनिहाय अहवाल प्रसिद्ध करावेत आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी अध्यक्ष शरद पवळे म्हणाले, शेतकऱ्यांच्या हक्काचा शेतरस्ता कोणत्याही परिस्थितीत मिळालाच पाहिजे. राज्यातील शेवटच्या गरजवंत शेतकऱ्याला न्याय मिळेपर्यंत शिव–पाणंद शेतरस्ता चळवळीचा संघर्ष सुरू राहणार आहे. 'शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धी' हे स्वप्न साकार करण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे.

मुख्य महसूल सचिवांकडे राज्यभरातील शेकडो प्रलंबित शेतरस्ता प्रकरणांचे पुरावे सादर करण्यात आले असून शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा शेतकरी बांधवांनी व्यक्त केली आहे.

यावेळी महाराष्ट्र राज्य शिव–पाणंद शेतरस्ता चळवळीचे शरद पवळे, रविंद्र खुडे, नाथाभाऊ शिंदे पाटील, बाळासाहेब थोरात, दशरथ खापरे, सुरेश वाटपाडे, पोपट शेळके, नानाजी शिंदे, गंगाधर वलवे, अशोक कचरे, विठ्ठल निर्मळ, विजय शेलार, सचिन शेळके, शांताराम पानमंद, सुरेश भुजबळ, रामहरी बोम्बे, सोमनाथ कुंभार्डे, अशोक जाधव, दशरथ वाळूंज, संजय साबळे, भाऊसाहेब वाळूंज, बनन गुंड यांच्यासह राज्यातील विविध भागांतील शेतकरी मंत्रालयात उपस्थित होते.

# अवतार मेहेर बाबा ट्रस्टशी लाल बावटा युनियनचे पगारवाढीचा करार; ३ वर्षांसाठी कामगारांना मिळणार ४,८०० रू. वाढ : करारावर स्वाक्षऱ्या

### बोनस व शैक्षणिक मदतीतही वाढ, कामगार संघटना आणि ट्रस्टमध्ये सलोख्याने तडजोड; सर्व कर्मचाऱ्यांना मिळणार लाभ



लाल बावटा जनरल कामगार युनियन संलग्न अवतार मेहेर बाबा कामगार युनियन आणि अवतार मेहेर बाबा ट्रस्ट यांच्यातील नवीन वेतनवाढ करार ४ जून रोजी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात पार पडला. सहाय्यक कामगार आयुक्त रे. मु. भोसले यांच्या उपस्थितीत युनियनचे पदाधिकारी आणि ट्रस्टच्या विश्वस्तांनी करारावर स्वाक्षऱ्या करून पुढील तीन वर्षांसाठी कामगारांच्या वेतन व विविध सुविधांबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला.

नगर – लाल बावटा जनरल कामगार युनियन संलग्न अवतार मेहेर बाबा कामगार युनियन आणि अवतार मेहेरबाबा ट्रस्ट यांच्यातील नवीन वेतनवाढ करार ४ जून रोजी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात पार पडला. सहाय्यक कामगार आयुक्त रे. मु. भोसले यांच्या उपस्थितीत युनियनचे पदाधिकारी आणि ट्रस्टच्या विश्वस्तांनी करारावर स्वाक्षऱ्या करून पुढील तीन वर्षांसाठी कामगारांच्या वेतन व विविध सुविधांबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला.

सन २०२३ ते २०२६ या कालावधीतील विद्यमान करार मार्च २०२६ मध्ये संपुष्टात आल्यानंतर नवीन करारासाठी कामगार संघटना आणि ट्रस्ट यांच्यात अनेक फेऱ्यांच्या बैठका झाल्या. दोन्ही बाजूंनी सकारात्मक भूमिका घेतल्याने कोणताही औद्योगिक वाद निर्माण न होता तडजोडीने हा करार करण्यात आला. यासाठी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात डिमांड नोटीस सादर करण्यात आली होती.

नवीन करारानुसार सन २०२६ ते २०२९ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी कामगारांना एकूण ₹४,८०० इतकी वेतनवाढ देण्यात येणार आहे. ही वाढ टप्प्याटप्प्याने लागू केली जाणार असून दरवर्षी ₹१,६०० प्रमाणे वेतनवाढ मिळणार आहे. याशिवाय दिवाळी बोनस व भेट रक्कम मिळून पूर्वीपेक्षा ₹१,५०० ची वाढ करण्यात आली असून आता कामगारांना ₹९,५०० इतका बोनस मिळणार आहे. कामगारांच्या कुटुंबीयांच्या शैक्षणिक गरजांचाही विचार करण्यात आला असून कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पात्रतेनुसार ₹१२ हजारांपर्यंत शैक्षणिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पूर्वी मिळणारे इतर सर्व लाभ नियमांनुसार कायम राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

नवीन करारावर स्टच्या वतीने विश्वस्त रमेश जंगले व युनियनच्या वतीने लाल बावटाचे जिल्हा सचिव कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, कॉ. ॲड. सुभाष लांडे, युनिट अध्यक्ष सतीश पवार यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी व्यवस्थापन लेबर ऑफिसर श्रीनिवास वंगार यांच्यासह उपाध्यक्ष संजय कांबळे, सचिव विजय भोसले, सुभाष शिंदे, प्रविण भिंगारदिवे, सुनिता जावळे, सुनिल दळवी, राधाकिसन कांबळे, चंद्रकला देशमुख, श्रीनाथ पाटोळे, रामदास कल्हापूरे, गणेश गहिले, राजेंद्र मोरे, दिगंबर माने आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना ॲड. सुधीर टोकेकर म्हणाले की, ट्रस्टसोबत संघटनेचा हा चौथा करार असून कामगारांच्या हक्कांसाठी सातत्याने लढा दिल्यामुळे किमान वेतनासह विविध लाभ मिळवून देण्यात यश आले आहे. वाढत्या महागाईच्या काळात कामगारांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी वेतनवाढ आवश्यक होती. ट्रस्टने सकारात्मक भूमिका घेत करारासाठी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

कॉ. ॲड. सुभाष लांडे यांनी सांगितले की, आयटक आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या माध्यमातून कामगारांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. संघटना स्थापन होण्यापूर्वी अनेक कामगार अत्यल्प वेतनावर काम करत होते आणि त्यांना विविध लाभांपासून वंचित राहावे लागत होते. मात्र संघटनेच्या संघर्षशील भूमिकेमुळे आणि ट्रस्टशी साधलेल्या समन्वयातून कामगारांना न्याय्य हक्क मिळाले आहेत. श्रमिकांच्या घामाला योग्य मोबदला मिळावा, हीच संघटनेची भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले.

ट्रस्टचे विश्वस्त रमेश जंगले यांनी सांगितले की, कामगारांशी समन्वय आणि विश्वासाचे वातावरण निर्माण करून हा करार करण्यात आला आहे. संघटनेशी संबंधित कामगारांबरोबरच ट्रस्टमधील सर्व कर्मचाऱ्यांना या कराराचा लाभ मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

युनिट अध्यक्ष कॉ. सतीश पवार यांनी सांगितले की, अवतार मेहेर बाबा ट्रस्टच्या कार्यक्षेत्रात काम करताना युनियनच्या माध्यमातून अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागले आहेत. कामगारांच्या न्याय्य मागण्यांबाबत ट्रस्टने सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. या करारामुळे कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास वाढला असून भविष्यातही कामगारांच्या हितासाठी प्रयत्न सुरू राहतील, असे त्यांनी सांगितले.



अवतार मेहेरबाबा नगर केंद्रामध्ये हेमंत रत्नपारखी लिखित मेहेरगाथाचे प्रकाशन सेंटरचे अध्यक्ष डॉ.मेहेरनाथ कलचुरी यांच्या हस्ते करण्यात आले.

# हेमंत रत्नपारखी लिखित मेहेरगाथाचे प्रकाशन

नगर – अवतार मेहेरबाबा नगर केंद्रामध्ये हेमंत रत्नपारखी लिखित मेहेरगाथाचे प्रकाशन सेंटरचे अध्यक्ष डॉ.मेहेरनाथ कलचुरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सुमित रत्नपारखी, अनिकेत रत्नपारखी, विना रत्नपारखी, विद्या माने, प्रकाश माने, मोहन जुंद्रे, श्रीमंत माळी, स्वप्निल महामुनी, ॲड. दारुणकर, राहुल मुळे, श्रुती मुळे, प्रशांत डाडर, नीलिमा औटी, माधुरी मिसाळ, ॲड. निंबाळकर, जेनस जॉईन, झारा मलकी आदींसह मेहेरप्रेमी उपस्थित होते

यावेळी मेहेरनाथ कलचुरी म्हणाले, हेमंत रत्नपारखी लिखित मेहेर गाथा हि काव्यात्मक रचना मराठीतील अवतार मेहेरबाबांच्या आध्यात्मिक कार्यावरील प्रथम अशी रचना पाहण्यात आली आणि मनास अतिशय आनंद झाला. या पद्य काव्यात्मक रचनेचे कौतुक करावे तितके थोडे आहे. अवतार मेहेरबाबांच्या जीवनातील अनेक प्रसंग, घटना आणि त्यांचे आध्यात्मिक कार्य आपण ओघावत्या शैलीत गुंफण्याचा जो कौतुकास्पद प्रयत्न केलेला आहे तो निश्चितच अभिनंदनीय आहे. हि पदय मेहेर गाथा निश्चितपणे अवतार मेहेरबाबांचे जे काही आध्यात्मिक साहित्य आज उपलब्ध आहे त्यात मोलाची भर टाकेल यात काही शंका नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील तमाम मेहेरप्रेमींना देखील हे अनोखे साहित्य उपलब्ध होत आहे हि भुषणास्पद बाब होय.

लेखक हेमंत रत्नपारखी म्हणाले, मेहेर गाथा या ओवीबद्ध काव्यरचनेतून अवतार मेहेरबाबांचे जीवन, त्यांच्या जीवनात आलेले बरे वाईट प्रसंग, त्यांनी देश विदेशात केलेल्या अध्यात्मिक कार्याचा प्रचार व प्रसार, समस्त प्रेमी जनांना दिलेला संदेश, शिक्षणाविषयी असणारी आस्था व दूरदृष्टी, मौनात राहून संभाषण करण्याची पद्धत तसेच त्यांची सेवाभावी व परोपकारी वृत्ती आणि सर्वांपरी असणारी प्रेम भावना यांचे शब्द चित्रण ओवीबद्ध करण्याचा प्रयत्न माझ्या हातून झाला आहे.हे लेखन कार्य अवतार मेहेरबाबांनीच माझ्या कडून करवून घेतले आहे असे मनापासून वाटते.

ते पुढे म्हणाले मी मंगळवेढा येथे राहत असून सराफी व्यवसाय करत आहे. गेली अनेक वर्षे मेहेरबाबांचा भक्त आहे मला जे सुचले त्याप्रमाणे मी ओवीबद्ध केले, मी सर्व अवतार मेहेरबाबाप्रेमींना ही ओवीबद्ध काव्यरचना आवडेल अशी अपेक्षा व्यक्त करत ही'मेहेरगाथा' मेहेरबाबांच्या चरणी अर्पण करत आहे.

यावेळी नगर सेंटरच्या वतीने भजने म्हणण्यात आली. कार्यक्रमाची सांगता मेहेरबाबांची आरती प्रार्थना व महाप्रसादाने झाली

## केंद्र सरकारच्या STEM उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील

# २ लाख विद्यार्थ्यांना मोफत रोबोटिक्स व कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण मिळणार

### आयकॉनिक रोबोटिक्स इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून विकास कोटकर यांचा अभिनव पुढाकार



नगर – विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वेगाने बदलणाऱ्या युगात विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्यांनी सक्षम करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारच्या STEM (Science, Technology, Engineering and Mathematics) उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील तब्बल दोन लाख विद्यार्थ्यांना मोफत रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स आणि नवोपक्रमाचे प्रशिक्षण देण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. आयकॉनिक रोबोटिक्स इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येणार असून त्याचे नेतृत्व विकास कोटकर करीत आहेत.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता प्रत्यक्ष कृतीवर आधारित प्रशिक्षण दिले जाणार आहे. रोबोट्सची रचना, विविध सेन्सर्सचा वापर, प्रोग्रामिंगची मूलतत्त्वे, कृत्रिम बुद्धिमत्तेचे व्यवहार्य उपयोग तसेच दैनंदिन जीवनातील समस्यांवर तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उपाय शोधण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना शिकविले जाणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्याबरोबरच सर्जनशीलता, संशोधनवृत्ती आणि समस्या सोडविण्याची क्षमता वाढीस लागणार आहे.

आजच्या स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे ही काळाची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांमधील तांत्रिक ज्ञानाची दरी कमी करण्यासाठीही मदत करणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष ओळख विद्यार्थ्यांना शालेय स्तरावरच मिळाल्याने त्यांच्यात नवकल्पना विकसित करण्याची प्रेरणा निर्माण होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. याबाबत बोलताना विकास भारत कोटकर म्हणाले, भविष्यातील तंत्रज्ञानाच्या जगासाठी विद्यार्थ्यांना सक्षम करणे, त्यांच्यामध्ये संशोधनाची आवड निर्माण करणे आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान पोहोचावे, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यासोबतच त्यांना भविष्यातील करिअरच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त शाळांनी आणि विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन विकास कोटकर यांनी केले आहे. ड्ढएच् आधारित हे प्रशिक्षण राज्यातील विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञानाच्या नव्या युगाची दारे खुली करणारे ठरणार असल्याची भावना शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

# अहिल्यानगरमध्ये ६ जून रोजी सुरमई शाम संगीत कार्यक्रम




नगर – मनोज कुमार प्रस्तुत ६ जुन रोजी सायंकाळी ६.३० वा.माऊली संकुल, सावेडी, अहिल्यानगर येथे सुरमई शाम संगीत कार्यक्रम, कराओके ट्रॅक शो आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये मनोज डफळ, आरती दिक्षित (पुणे) हे गाणे सादर करणार आहे. तर त्यांना साथ संजय भिंगारदिवे, भैरवनाथ अडागळे, बाळासाहेब शिंदे, बाबासाहेब जगताप हे करणार आहे. उस्मान पाटणी(नाशिक) हे निवेदन करणार आहे

कार्यक्रम विनामूल्य आहे. संगीतप्रेमींनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आली.

# संगमनेर येथे ६ जूनला शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी मेगा कृषी कर्ज अभियान मेळावा

### कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा उपक्रम : क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे



नगर – देशातील पहिली स्वदेशी आणि राष्ट्रीयकृत बँक असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने शेतकरी, बचत गट, कृषी उद्योजक व शेतीपूरक व्यवसायिकांसाठी देशव्यापी मेगा कृषी कर्ज अभियान कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा ६ जून रोजी सकाळी १०.३० वाजता विघ्नहर्ता पॅलेस, समनापुर गणपती मंदिरासमोर, सुकेवाडी नगर रोड, संगमनेर येथे होणार आहे.

कृषी क्षेत्राचा विकास, शेतकऱ्यांना बँकिंग सुविधांचा लाभ आणि शेतीपूरक उद्योगांना आर्थिक बळ देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. कार्यक्रमामध्ये शेतकरी, महिला बचत गट, अन्न प्रक्रिया उद्योजक, डेअरी, पोल्ट्री, कृषी सेवा केंद्र चालक तसेच विविध शेतीपूरक व्यवसायिकांना बँकेच्या कर्ज योजनांची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे.

या अभियानांतर्गत किसान क्रेडिट कार्ड, बचत गट कर्ज, कृषी उपकरण कर्ज, डेअरी व पोल्ट्री कर्ज, बायोगॅस प्रकल्प, कोल्ड स्टोरेज, पीक कर्ज, कृषी व अन्न प्रक्रिया उद्योग कर्ज तसेच एग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर फंड यांसारख्या विविध योजनांचा लाभ उपलब्ध करून दिला जाणार आहे. यावेळी नवीन कर्ज प्रस्ताव स्वीकारले जाणार असून पात्र लाभार्थ्यांना मंजूर कर्जांचे वितरणही करण्यात येणार आहे.

कार्यक्रमास नाशिक विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अहिल्यानगर शाखेचे क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक आशिष नवले, बँकेचे वरिष्ठ अधिकारी आणि कृषी विभागातील विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यात उपस्थित बँक अधिकारी शेतकरी व उद्योजकांच्या कर्ज प्रस्तावांची प्राथमिक तपासणी करून कर्ज प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करणार आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी व कृषी उद्योजकांना सुलभ पद्धतीने कर्ज उपलब्ध करून देत कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे यांनी सांगितले. सर्व शेतकरी, स्वयं–सहाय्यता बचत गट, कृषी उद्योजक आणि शेतीपूरक व्यवसायिकांनी या मेळाव्यास उपस्थित राहून किंवा जवळच्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या शाखेशी संपर्क साधून विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही दुबे यांनी केले आहे.

शेती व शेतीपूरक व्यवसाय हे देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने या क्षेत्रातील नागरिकांपर्यंत बँकिंग सुविधा आणि शासकीय योजनांची माहिती पोहोचविणे आवश्यक आहे. त्यासाठी हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक आशिष नवले यांनी सांगितले.

# औक्षण करत वंडर किड्स प्री स्कूलमध्ये नवागत चिमुकल्यांचे जल्लोषात स्वागत




वंडर किड्स प्री स्कूलमध्ये नवागत चिमुकल्यांचे औक्षण करत जल्लोषात स्वागत करण्यात आले.

नगर – सावेडीतील पाईपलाईन रस्त्यावरील रेणुका माता मंदिरामागे असलेल्या वंडर किड्स प्री स्कूल मध्ये प्ले ग्रुपमध्ये तसेच नर्सरी, एल के जी यू के जी मध्ये प्रवेश घेतलेल्या नवागत चिमुकल्यांचे पारंपरिक औक्षण करून खास स्वागत करण्यात आले.

शाळेच्या परिसरात आकर्षक रांगोळ्या, रंगीबेरंगी फुगे आणि लहान मुलांना आकर्षित करणारी देखणी सजावट करण्यात आली होती. मुलांच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्यासाठी रिमोट कार, उंट सवारी, बलून फायरिंग, सी–सॉ, घसरगुंडी यांसारख्या विविध खेळांची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे शाळेचा परिसर एखाद्या फन–फेस्टिव्हलप्रमाणे दिसत होता.

पहिल्यांदाच शाळेत येणाऱ्या चिमुकल्यांचे स्वागत गंध, अक्षदा आणि औक्षण करून करण्यात आले. मुलांना शाळेत सोडण्यासाठी आलेल्या पालकांनी आणि शिक्षकांनी हवेत रंगीबेरंगी फुगे सोडत आनंद व्यक्त केला. अनेक पालकांनी मुलांसोबत सेल्फी घेत या खास क्षणांची आठवण आपल्या मोबाईलमध्ये कैद केली. वंडर किड्स प्री स्कूलमध्ये दरवर्षी नव्या विद्यार्थ्यांचे स्वागत अशाच अनोख्या आणि प्रेमळ पद्धतीने केले जाते. शाळेच्या मुख्य संचालिका वैशाली जाधव यांनी उपस्थित पालक आणि विद्यार्थ्यांचे स्वागत करत शाळेच्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. वडगाव गुप्ता येथेही वंडर किड्सची शाखा कार्यरत असून भविष्यात ही संस्था इयत्ता दहावीपर्यंतचे संपूर्ण स्कूल सुरू करण्याच्या तयारीत असल्याचे त्यांनी सांगितले. स्वागत सम ारंभानंतर चिमुकल्यांनी विविध खेळांचा मनमुराद आनंद घेतला. हसत–खेळत शिक्षण, निसर्गातून ज्ञान आणि खेळातून विकास या संकल्पनेवर आधारित अभ्यासक्रमामुळे वंडर किड्स प्री स्कूल पालकांमध्ये विशेष लोकप्रिय ठरत आहे. मुलांच्या प्राथमिक शिक्षणाचा मजबूत पाया घालण्यासाठी आधुनिक पद्धतीने शिक्षण दिले जात असल्याने नवोदित पालकांकडून या शाळेला मोठी पसंती मिळत आहे.

# स्काय ब्रिज सोसायटी ठरतेयं आनंदी, सांस्कृतिक व कौटुंबिक जीवनाचे आदर्श केंद्र



आधुनिक सुविधा, सांस्कृतिक परंपरा आणि कौटुंबिक जिव्हाळा यांचा सुंदर संगम असलेल्या स्काय ब्रिज सोसायटीत वर्षभर विविध सामाजिक, धार्मिक व मनोरंजनात्मक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. सोसायटीमधील सभासदांमध्ये जिव्हाळा, आपुलकी आणि एकोप्याचे वातावरण निर्माण करण्यात व्यवस्थापन समितीने विशेष पुढाकार घेतला आहे.

सोसायटीचे अध्यक्ष अमृतलालजी चंदूलाल कोठारी, खजिनदार मनोज अंबरचंद चंगेडिया, सचिव योगेश रामसुख मंत्री तसेच व्यवस्थापन समितीचे सभासद प्रवीण कांतीलाल भंडारी, विजय राजेंद्र गुंदेचा, दर्शन राजेंद्र सिकची, सौ. नेहा सौरभ झंवर, महावीर रसिकलाल मुथा, स्वप्नील सुरेश ओस्तवाल, पीयूष राजेंद्र कटारिया आणि सपना निनाद भलगट यांच्या नेतृत्वाखाली अनेक उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आले.

मागील वर्षभरात पर्युषण पर्व, गणेशोत्सवातील दहा दिवसांचे रंगारंग कार्यक्रम, दिवाळी, मकर संक्रांत, होळी उत्सव, वाढदिवस समारंभ, महिलांसाठी दर महिन्याला आयोजित करण्यात येणारे गेट–टुगेदर तसेच सर्व सभासदांचे पारिवारिक गेट–टुगेदर मोठ्या उत्साहात पार पडले. याशिवाय हुरडा पार्टीसारख्या विशेष उपक्रमांनाही उत्तम प्रतिसाद मिळाला.

स्काय ब्रिज सोसायटीची आधुनिक व आकर्षक सुविधा हे देखील येथील विशेष आकर्षण ठरत आहे. स्विमिंग पूल, पार्टी लॉन, किड्स प्ले एरिया, नाना–नानी पार्क, संध्याकाळच्या गप्पांसाठी खास चिटचॅट झोन अशा सुविधा सभासदांच्या दैनंदिन जीवनातील ताणतणाव दूर करण्यास मदत करत आहेत. येथे निर्माण झालेली मैत्री ही केवळ ओळख न राहता एका मोठ्या कुटुंबात रूपांतरित झाली असल्याची भावना अनेक सभासद व्यक्त करतात.

विशेष म्हणजे, गेल्या सलग ३१ महिन्यांपासून प्रत्येक महिन्याच्या २८ तारखेला सोसायटीमध्ये सामूहिक आनंदचालीसाचे आयोजन करण्यात येत आहे. समृद्धी, मनाची एकाग्रता आणि उत्तम आरोग्य यासाठी आयोजित हा आध्यात्मिक उपक्रम सभासदांसाठी श्रद्धा व सकारात्मक ऊर्जेचा स्रोत ठरत आहे. यंदाचे ३२ वे सामूहिक आनंदचालीसा पठण महासती साध्वी सुयशाजी व महासती साध्वी सुजयाजी यांच्या पावन उपस्थितीत अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाले. या विशेष कार्यक्रमाचे आयोजन स्काय ब्रिजचे सदस्य फुलचंद गुगळे (पाथर्डी) यांनी केले होते.

सोसायटीमध्ये साधू–संतांचे कायम आगमन होत असून, त्यांना येथे माहेरघरासारखे प्रेम, सन्मान आणि आत्मीयता लाभत असल्याची भावना व्यक्त केली जाते.

येणाऱ्या वर्षात अधिक जोमाने व उत्साहाने नवीन सांस्कृतिक, सामाजिक व मनोरंजनात्मक कार्यक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले असून बाहेरगावी सहलींचे आयोजनही करण्यात येणार आहे. सोसायटीच्या या उपक्रमांचे सर्व सभासदांकडून कौतुक होत असून व्यवस्थापन समितीला शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

# जय आनंद महावीर युवक मंडळाच्यावतीने शाकाहारी टिफीन बनवा स्पर्धेचे आयोजन

### पौष्टिकता आणि चव यांचा संगम असलेल्या रेसिपींना आकर्षक बक्षीस



नगर – जय आनंद महावीर युवक मंडळाने शुद्ध शाकाहारी पौष्टिक टिफीन बनवा स्पर्धा आयोजित केली आहे. पौष्टिकता आणि चव यांचा संगम असलेल्या पहिल्या ५ रेसिपींना आकर्षक बक्षीस दिले जाणार आहे, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी दिली.

मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा व कार्याध्यक्ष सत्येन मुथा यांनी सांगितले की, विद्यार्थी आणि पालकांमध्ये पौष्टिक आहाराबाबत जागरूकता निर्माण करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. मुलांच्या वाढीसाठी आणि बौद्धिक विकासासाठी परिपूर्ण, चौरस आहार नियमित घेणे आवश्यक असते. डॉक्टर मंडळीही मुलांना जंक फूड पासून लांब ठेवण्याचा सल्ला देतात. शुद्ध शाकाहारी टिफीन मध्ये हिरव्या पालेभाज्या, फळभाज्या, विविध फळे, कडधान्ये, ज्वारीचे घावन, नाचणीचे लाडू, क्विनोआ पुलाव, सोया टिक्की, रंगीत स्प्राउट्स चाट, तांदळाचे विविध पदार्थ तयार केले जाऊ शकतात. मुलांना चविष्ट आणि रूचकर टिफीन दिल्यास ते आवडीने खातील आणि आनंदाने रोज पौष्टिक टिफीनचा आग्रह धरतील. सध्या इंटरनेट, मोबाईलमुळे मैदानी खेळ कमी झाले आहेत. अशा वेळी शरीराचे चांगले पोषण होण्यासाठी सकस आहार महत्त्वाचा आहे.


टिफीनची पौष्टिकता, स्वच्छता, नाविन्य आणि सादरीकरण या निकषांवर गुणदान केले जाईल. इच्छुक गृहिणींनी स्वतःच्या घरीच टिफीन बनवायचा असून टिफीनचा फोटो आणि लिखित रेसिपी स्टेशन रोडवरील मुनोत इस्टेट येथील 'वर्धमान प्लायवूड सेंटर' येथे किंवा नवीपेठ येथील 'रोहित कॉस्मेटिक्स' येथे जमा करायची आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अंतिम १४ जून पर्यंत राहील. गृहिणींनी या स्पर्धेत सहभागी होऊन आपले पाक कौशल्य सादर करावे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## चीनमध्ये घडली जलक्रांती

चीनने जमिनीचा ऱ्हास आणि हवामान बदल रोखण्यासाठी झाडे लावण्याचे आणि गवताळ प्रदेशांचे पुनर्संचयन करण्याचे जे मोठे प्रयत्न केले आहेत, त्यामुळे देशभरातील पाण्याच्या उपलब्धतेमध्ये मोठे आणि अनपेक्षित बदल झाले आहेत, असे एका नवीन संशोधनातून समोर आले आहे. पाण्याचे चक्र यामुळे मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्याचे दिसले आहे.



'अर्थ्स फ्युचर' जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, २००१ ते २०२० या काळात वनस्पतींच्या आवरणात झालेल्या बदलांमुळे पूर्वेकडील मान्सून प्रदेश आणि वायव्येकडील शुष्क प्रदेश, जो एकत्रितपणे चीनच्या एकूण भूभागाचा ७४ टक्के भाग आहे, येथे मानवासाठी आणि परिसंस्थांसाठी उपलब्ध असलेल्या गोड्या पाण्याची मात्रा कमी झाली आहे. याच काळात चीनच्या उर्वरित भूभागाचा भाग असलेल्या तिबेटियन पठारी प्रदेशात मात्र पाण्याची उपलब्धता वाढली, असे वैज्ञानिकांना आढळले आहे. नेदरलँडस्मधील उट्रेख्त विद्यापीठातील परिसंस्था लवचिकता विभागाचे सहायक प्राध्यापक आणि या अभ्यासाचे सह-लेखक अरी स्टाल यांनी सांगितले की, 'आम्हाला आढळले आहे की, भू-आवरण बदलांमुळे पाण्याचे पुनर्वितरण होते.

चीनने गेल्या काही दशकांमध्ये मोठ्या प्रमाणावर हिरवळ वाढवण्याचे काम केले आहे. त्यांनी सक्रियपणे, विशेषतः लोएस पठारावर, समृद्ध परिसंस्था पुनर्संचयित केल्या आहेत. यामुळे पाण्याचे चक्रही पुन्हा सक्रिय झाले आहे.' पृथ्वीचे खंड आणि वातावरण यांच्यात पाणी फिरवणाऱ्या तीन मुख्य प्रक्रिया आहेत: बाष्पीभवन आणि बाष्पोत्सर्जन पाणी वर घेऊन जातात, तर पर्जन्यवृष्टी ते खाली आणते. बाष्पीभवन : पृष्ठभाग आणि मातीमधून पाणी काढून टाकते. बाष्पोत्सर्जन : वनस्पतींनी मातीतून शोषलेले पाणी काढून टाकते.

एकत्रित परिणाम : या दोन्ही प्रक्रिया मिळून बाष्पोत्सर्जन तयार होते. वनस्पतींचे आवरण, पाण्याची उपलब्धता आणि जमिनीवर पोहोचणाऱ्या सौर ऊर्जेच्या प्रमाणानुसार ते बदलते. स्टाल म्हणाले, 'गवताळ प्रदेश आणि जंगल या दोन्हीमुळे बाष्पोत्सर्जन वाढते. झाडांना खोलवर मुळे असल्याने ती कोरड्या क्षणी पाणी मिळवू शकतात, त्यामुळे जंगलांमध्ये याचा प्रभाव विशेषतः मजबूत असतो.' चीनचा सर्वात मोठा वृक्षारोपण प्रकल्प म्हणजे देशाच्या शुष्क आणि अर्ध-शुष्क उत्तरेकडील ग्रेट ग्रीन वॉल. १९७८ मध्ये सुरू झालेल्या या प्रकल्पाचा उद्देश वाळवंटाचा विस्तार कमी करणे हा होता.

गेल्या पाच दशकांत यामुळे चीनमधील वन आवरण १९४९ मधील सुमारे १० टक्क्यांवरून आज २५ टक्क्यांपेक्षा जास्त वाढले आहे. हे क्षेत्र अल्जेरियाच्या आकाराएवढे आहे. गेल्यावर्षी सरकारी प्रतिनिधींनी जाहीर केले की, देशाने सर्वात मोठ्या वाळवंटाला वनस्पतींनी वेढण्याचे काम पूर्ण केले आहे, परंतु वाळवंटीकरण नियंत्रणात ठेवण्यासाठी वृक्षारोपण सुरू ठेवले जाईल. चीनमधील इतर मोठे 'हरितीकरण' प्रकल्प म्हणजे 'ग्रेन फॉर ग्रीन प्रोग्राम' आणि 'नॅचरल फॉरेस्ट प्रोटेक्शन प्रोग्राम' हे आहेत, जे दोन्ही १९९९ मध्ये सुरू झाले. 'ग्रेन फॉर ग्रीन प्रोग्राम' अंतर्गत शेतकऱ्यांना शेतजमिनीचे वन आणि गवताळ प्रदेशात रूपांतर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते, तर 'नॅचरल फॉरेस्ट प्रोटेक्शन प्रोग्राम' प्राथमिक जंगलांमध्ये लाकूडतोडीवर बंदी घालतो आणि वनीकरण वाढवतो.

## पृथ्वीबाबतची पैज, बक्षीस ३ अब्ज डॉलर्स!

पृथ्वी सपाट असल्याचा दावा करणाऱ्या फ्लॅट अर्थ सिद्धांत मानणाऱ्यायांसाठी अमेरिकेतील एका अब्जाधीश उद्योगपतीने आयुष्यभराची सर्वोत्तम संधी जाहीर केली आहे. कोलंबिया स्पोर्टवेअर कंपनीचे ७६ वर्षीय सीईओ टिम बॉयल यांनी एक अनोखी स्पर्धा सुरू केली आहे. टिम बॉयल यांनी फ्लॅट अर्थर्सना आव्हान दिले आहे की, त्यांनी पृथ्वीची खरी किनार शोधून काढावी आणि त्या अथांग दरीचा फोटो काढून आणावा. जर त्यांनी हे सिद्ध केले, तर बॉयल त्यांची ३ अब्ज डॉलर्सची कौटुंबिक कंपनी त्या विजेत्याच्या हवाली करतील.

एक्सपेडिशन इम्पॉसिबल या नवीन मार्केटिंग मोहिमेचा भाग म्हणून बॉयल यांनी हा संदेश दिला. ते म्हणाले, फ्लॅट अर्थर्ससाठी हा संदेश आहे. तुम्ही दावा करता की, पृथ्वीला शेवट आहे. फक्तजा, एक फोटो काढा, आम्हाला पाठवा आणि कंपनीची मालमत्ता मिळवा. बॉईल यांनी यात कोणतेही कायदेशीर



अडथळे नसल्याचे सांगितले असले, तरी जाहिरातीत लगेच त्यांच्या वकिलांनी हजर होत एक फाईन प्रिंट समाविष्ट केली. बॉयल यांनी कंपनीचा मुख्य भाग नाही, तर द कंपनी, एलएलसी नावाची एक वेगळी उपकंपनी बक्षीस म्हणून ठेवली आहे, जिची मालमत्ता अजूनही १ लाख डॉलर्स इतकी आहे. त्यामुळे मुख्य कंपनी मिळाली नसली तरी, विजेत्याला चांगली रक्कम मिळू शकते.

**वैज्ञानिक पुरावे आणि वाद**

मानवाला प्राचीन काळापासून पृथ्वी गोल असल्याचे माहीत आहे. अवकाश मोहिमा, उपग्रह आणि अगदी क्षितिजावर जहाजे अदृश्य होण्यासारखे साधे निरीक्षण पृथ्वी गोल असल्याचे सिद्ध करतात. तरीही, फ्लॅट अर्थ सिद्धांत मानणारे लोक या पुराव्यांना षडयंत्र किंवा फेक मानतात. नॉटिंगहॅम ट्रेंट युनिव्हर्सिटीचे भौतिकशास्त्रज्ञ डॉ. इयान व्हिटेकर यांच्या मते, आपण जमिनीवर असताना पृथ्वीचा वक्र भाग दिसत नाही. कारण, आपला आकार पृथ्वीच्या वक्रतेच्या तुलनेत नगण्य आहे.

## अंटार्क्टिकावर जाताना दुखरा दात आणि अपेंडिक्स का काढावा लागतो?

पृथ्वीवरील सात खंडांपैकी एक असलेला अंटार्क्टिका हा सर्वात थंड प्रदेशांपैकी एक आहे. येथील तापमान उणे ८० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचू शकते आणि हिवाळ्यात परिस्थिती इतकी गंभीर होते की, विमाने कित्येक महिने उतरू शकत नाहीत. अशा परिस्थितीत राहणे ही केवळ कल्पनारम्य गोष्ट आहे. तिथे राहणे केवळ संशोधनासाठी शक्य आहे आणि त्यासाठी सुद्धा एखाद्याला कठोर वैद्यकीय मंजुरी घ्यावी लागते. अंटार्क्टिकाचा प्रवास करणाऱ्या शास्त्रज्ञांना कोणत्याही समस्येसाठी त्यांचे अपेंडिक्स आणि दात काढून टाकावे लागतात. जर तुम्हाला कोणतीही समस्या नसेल, तर तुम्हाला दात काढण्याची गरज नाही!



जर तुम्हाला दातदुखी (विंडम टीथ) असेल, तर तिथल्या कडक हिवाळ्यामुळे तुमची अस्वस्थता वाढू शकते. तिथे रुग्णालये आणि वैद्यकीय सेवा सुविधा सहज उपलब्ध नसतात, म्हणून दंत काळजी घेऊन प्रवास करण्यापूर्वी सावधगिरी बाळगणे चांगले असते. जर वैद्यकीय आणीबाणी उद्भवली तर त्वरित मदत मिळणे जवळजवळ अशक्य आहे. ॲपेंडिसाइटिस असलेल्यांनाही हेच लागू होते. ॲपेंडिसाइटिस ही अशी स्थिती आहे, जी अचानक उद्भवते आणि काही तासांतच गंभीर होऊ शकते. जर शस्त्रक्रिया त्वरित केली नाही, तर ती प्राणघातक ठरू शकते. म्हणूनच, या वैद्यकीय स्थितीने ग्रस्त असलेल्यांसाठी जाणे धोकादायक मानले जाते.

अंटार्क्टिकाला प्रवास करण्यासाठी शारीरिक तपासणी आवश्यक आहे. मानसिक मूल्यांकनदेखील आवश्यक आहे. तेथे दीर्घकाळ अंधार असतो आणि तुम्हाला विविध आव्हानांना सामोरे जावे लागते, ज्यामध्ये एकटेपणा आणि अती थंडीचा मानसिक ताण यांचा समावेश असतो. या विशाल पांढऱ्या भागात जगणे अशक्य आहे; तिथे जाणाऱ्या काही निवडक लोकांसाठी प्रत्येक दिवस संघर्षाचा असतो. म्हणूनच तुमचे अपेंडिक्स आणि समस्याग्रस्त दात आधीच काढून टाकण्याची शिफारस केली जाते. वैज्ञानिक टीमने कालांतराने, 'टाळता येणारा कोणताही वैद्यकीय धोका अंटार्क्टिकावर पोहोचण्यापूर्वीच काढून टाकला पाहिजे' असे तत्त्व विकसित केले आहे. येथील तापमान हिवाळ्यात उणे ६० अंश ते उणे ८० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचू शकते, ज्याचा विक्रम उणे ८९.२ अंश सेल्सिअस आहे, जे पृथ्वीवरील सर्वात कमी तापमान आहे. काही ठिकाणी वाऱ्याचा वेग ताशी २०० कि.मी.पर्यंत पोहोचू शकतो, म्हणजे तुम्ही तुमच्या छावणीच्या बाहेर पाऊलही टाकू शकत नाही. जगात इतरत्र, आपत्कालीन परिस्थितीत रुग्णालय किंवा वैद्यकीय पथकापर्यंत पोहोचण्यासाठी काही मिनिटे लागतात. परंतु, अंटार्क्टिकामध्ये वेळेवर मदत मिळणे अशक्य मानले जाते. म्हणूनच येथे राहणारे लोक वैद्यकीयदृष्ट्या शंभर टक्के तंदुरुस्त असले पाहिजेत.

## पुरातत्त्वशास्त्रज्ञांना सापडले स्मिथकालीन पुरावशेष

सुमारे ४०० वर्षांपूर्वी, इंग्रज वसाहतवादी आणि शोधक जॉन स्मिथ याने आपल्या नोंदींमध्ये (जर्नलमध्ये) लिहिले होते की, आताच्या व्हर्जिनियामधील एका प्रमुख नदीकिनारी आदिवासींची गावे (वस्त्या) होती. मात्र, त्या गावांची नोंद असलेली ठिकाणे कालांतराने विसरली गेली आणि त्यांच्या अस्तित्वाबद्दलही शंका व्यक्त केली जात होती. आता, रॅपाहॅनॉक नदीच्या



किनाऱ्यावर उत्खनन करणाऱ्या पुरातत्त्वशास्त्रज्ञांना हजारो पुरावशेष सापडले आहेत. यात मणी, मातीच्या भांड्यांचे तुकडे, दगडाची हत्यारे आणि तंबाखू पिण्याचे पाईप्स यांचा समावेश आहे. हे अवशेष जॉन स्मिथने शतकांपूर्वी वर्णन केलेल्या गावांचेच असल्याचा त्यांचा विश्वास आहे.

'या अवशेषांच्या उपस्थितीमुळे मौखिक इतिहास आणि दस्तावेज या दोन्ही गोष्टींना पुष्टी मिळते, ज्यामुळे सिद्ध होते की, १६०८ मध्ये कॅप्टन जॉन स्मिथने रॅपाहॅनॉक नदीचा नकाशा तयार करताना येथे अनेक आठवडे घालवले होते,' असे उत्खननाचे नेतृत्व करणाऱ्या सेंट मेरी कॉलेज ऑफ मेरीलँडमधील मानववंशशास्त्राच्या प्राध्यापिका ज्युलिया किंग यांनी सांगितले. नदीचा हा महत्त्वाचा भाग उंच कड्यांनी वेढलेला आहे, ज्यामुळे वरच्या वस्तीपर्यंत पोहोचणे मर्यादित होते. या उंचीमुळे नदीच्या संपूर्ण खोऱ्याचे विहंगम दृश्य दिसत असे.

तसेच, या जागेची माती मका पिकवण्यासाठी उत्तम होती, अशी माहिती किंग यांनी दिली. या नदीला व्हर्जिनियामध्ये मान्यता मिळालेल्या ११ मूळ अमेरिकन गटांपैकी एक असलेल्या रॅपाहॅनॉक जमातीचे नाव देण्यात आले आहे. या जमातीचे अनेक सदस्य अजूनही जवळच्या परिसरात राहतात आणि नदीकिनारी असलेली त्यांची वंशपरंपरागत जमीन परत मिळवून तिचे संरक्षण करण्याची त्यांची इच्छा असल्याचे किंग यांनी सांगितले. जॉन स्मिथ युरोपमध्ये भाडोत्री सैनिक आणि साहसी व्यक्ती म्हणून कार्यरत होता. १६०८ मध्ये त्याची व्हर्जिनियातील जेम्सटाऊन वसाहतीच्या परिषदेचा अध्यक्ष म्हणून निवड झाली. (जेम्सटाऊनची स्थापना एका वर्षापूर्वी झाली होती आणि ती उत्तर अमेरिकेतील पहिली कायमस्वरूपी इंग्रजी वसाहत म्हणून ओळखली जाते.)

## शाही थडग्यात सापडला खजिना!

इजिप्तमधील तानिस येथील प्राचीन शाही थडग्यात पुरातत्त्वशास्त्रज्ञांना एक अविश्वसनीय खजिना सापडला आहे. हा शोध इतका दुर्मीळ आहे की, यामुळे इजिप्तचा इतिहास पुन्हा लिहावा लागणार आहे. संशोधकांना तानिसच्या वाळूखाली दडलेल्या एका थडग्यात २२५ उत्कृष्ट कोरीव अंत्यसंस्काराच्या मूर्ती सापडल्या आहेत. या मूर्ती एका रहस्यमय धार्मिक पद्धतीनुसार मांडलेल्या होत्या; पण आश्चर्य म्हणजे, या थडग्यात शरीर मात्र नव्हते. या मूर्तींपैकी निम्म्याहून अधिक मूर्ती स्त्रियांच्या आहेत. पण, आजवरच्या शाही दफनविधींबाबत जे संशोधन झाले आहे. त्यात स्त्रियांच्या मूर्ती आणि रहस्यमय धार्मिक विधीची माहिती आढळलेली नाही. यामुळे इजिप्तच्या तिसऱ्याया मध्यवर्ती काळातील अंत्यसंस्काराच्या पद्धतींबद्दल नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. या मूर्ती ताराकृती रचनेत आणि परिपूर्ण आडव्या रांगांमध्ये मांडलेल्या होत्या, ज्यामुळे गेल्या ३,००० वर्षांत या विधीला कोणीही स्पर्श केला नाही, हे सिद्ध होते.





**फेरो शोशेंकचे रहस्य उलगडले**

या मूर्तींवर असलेल्या शाही चिन्हांमुळे एक मोठे रहस्य उलगडले. या रिकाम्या थडग्यावरची मालकी फेरो शोशेंक तिसरा या राजाची असल्याचे निश्चित झाले. या राजाने इ.स.पूर्व ८३० ते ७९१ पर्यंत राज्य केले होते; परंतु त्याचे अंतिम विश्रामाचे ठिकाण (फायनल रेस्टिंग प्लेस) अनेक दशकांपासून पुरातत्त्वशास्त्रज्ञांसाठी गूढ राहिले होते. या थडग्याच्या शोधाने जुने समज मोडून काढले आहेत आणि राजा स्वतःच्याच थडग्यात दफन का झाला नाही, हा प्रश्न पुढे आला आहे. राजा थडग्यात का नव्हता? या प्रश्नावर दोन शक्यता व्यक्त केल्या जात आहेत. फ्रेंच इजिप्तोलॉजिस्ट फ्रेडरिक पायराडो यांच्या मते, शोशेंक तिसरा या राजाने ज्या काळात राज्य केले (इजिप्तचा तिसरा मध्यवर्ती काळ), तो काळ राजकीय फूट आणि सत्ता संघर्षाचा होता.

त्यांच्या ४० वर्षांच्या राजवटीत वरच्या आणि खालच्या इजिप्तमध्ये रक्तरंजित गृहयुद्ध झाले होते. यामुळे शाही उत्तराधिकार योजना (रॉयल सक्शेशन प्लॅन) अपेक्षेप्रमाणे झाली नसावी आणि राजांना त्यांच्या निवडलेल्या थडग्यात दफन करता आले नसावे. दुसरी शक्यता अशी आहे की, नंतरच्या काळात लुटारूंनी त्यांचे अवशेष हलवले असावेत. पायराडो म्हणाले की, एका राजासाठी थडगे बांधणे हे एक प्रकारचा जुगार असतो. कारण, तुमचा वारसदार तुम्हाला तिथे दफन करेलच याची खात्री नसते. तानिस येथील राजा तुतनखामूनच्या थडग्यानंतर ८० वर्षांतील हा सर्वात महत्त्वाचा शोध मानला जात आहे.

## आढळले प्राचीन नाण्यांनी भरलेले माठ

फ्रान्समधील पुरातत्त्वशास्त्रज्ञांना एका प्राचीन वस्तीमधील घराखालील खड्ड्यात पुरलेले रोमन साम्राज्यातील हजारो नाण्यांनी भरलेले तीन प्राचीन साठवणुकीचे माठ सापडले आहेत. सुमारे १,७०० वर्षांपूर्वी हे माठ सुरक्षित ठेवण्यासाठी किंवा 'पिगी बँक' म्हणून पुरले गेले असावेत.

ईशान्य फ्रान्समधील सेनन गावात नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर प्रिव्हेंटिव्ह आर्कियोलॉजिकल रिसर्च (INRAP) या संस्थेद्वारे चालवलेल्या उत्खननादरम्यान हे तीन मोठे माठ (ज्याला 'अम्फोरा'



म्हणतात) उघडकीस आले. या तीन माठांमध्ये एकूण ४०,००० हून अधिक रोमन नाणी असण्याची शक्यता आहे. पहिला साठा : या माठात अंदाजे ८३ पौंड (३८ किलोग्रॅम) वजनाची नाणी होती, जी 'सुमारे २३,००० ते २४,००० नाण्यांशी जुळतात, अशी माहिती व्हिन्सेंट जेनेव्हीव्ह, जे INRAP मधील नाणीशास्त्रज्ञ आहेत आणि या साठ्यांचे विश्लेषण करत आहेत, त्यांनी दिली.

दुसरा साठा : दुसऱ्या माठाचे आणि नाण्यांचे वजन सुमारे ११० पौंड (५० किलो) होते आणि शोध लागला तेव्हा माठाचा गळा तुटलेला होता, तेथून मिळालेल्या ४०० नाण्यांच्या आधारावर यात १८,००० ते १९,००० नाणी असू शकतात, असे जेनेव्हीव्ह यांनी सांगितले. तिसरा साठा : तिसरा माठ प्राचीन काळातच बाहेर काढण्यात आला होता, आणि तो माठ ठेवलेल्या खड्ड्यात केवळ तीन नाणी शिल्लक होती. या भागात यापूर्वीच सुमारे ३० नाण्यांचे साठे सापडले आहेत, त्यामुळे या शोधाचे खरे महत्त्व नाण्यांच्या संख्येमध्ये नसून, हे साठे ज्या ठिकाणी सापडले, त्या ठिकाणासंबंधी तपशीलवार माहिती मिळाली आहे. पहिल्या दृष्टीक्षेपात वाटेल त्याप्रमाणे, असुरक्षिततेच्या काळात लपवलेला हा 'खजिना' आहेच हे निश्चित नाही, असे खछठअझ च्या निवेदनात म्हटले आहे.

नाण्यांवर असलेल्या तारखांच्या आधारावर, तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, हे माठ इ.स. २८० ते ३१० च्या दरम्यान पुरले गेले असावेत. या साठ्यांमध्ये अशी नाणी आहेत, ज्यावर सम्राट व्हिक्टोरिनस, टेट्रिकस पहिला आणि त्याचा मुलगा टेट्रिकस दुसरा यांचे अर्धपुतळे आहेत. हे सम्राट गॉलिक साम्राज्याचे होते. गॉलिक साम्राज्याने २६० ते २७४ पर्यंत उर्वरित रोमन साम्राज्यापासून स्वतंत्रपणे गॉल आणि आसपासच्या प्रांतांवर राज्य केले होते, नंतर २७४ मध्ये सम्राट ऑरेलियनने ते पुन्हा रोमन साम्राज्यात विलीन केले.

## सर्वात मोठा गुलाबी हिरा

दक्षिण आफ्रिकेजवळील लेसोथो देशात असलेल्या काओ खाणीत एक प्रचंड मोठा आणि दुर्मीळ १०८.३९ कॅरेटचा गुलाबी हिरा सापडला आहे. आंतरराष्ट्रीय रत्नशास्त्रीय संस्थेच्या (आयजीआय) अहवालानुसार, हा शोध हिरा उद्योगाला हादरवून सोडणारा असून, या हिऱ्यायाची किंमत लिलावात कोट्यवधी डॉलर्समध्ये जाण्याची शक्यता आहे. १०८.३९ कॅरेट वजनाचा हा हिरा आजपर्यंत सापडलेल्या सर्वात मोठ्या गुलाबी हिऱ्यायांपैकी एक आहे.

काओ खाणीतील या एकाच खडबडीत दगडातून (रफ स्टोन) अनेक मौल्यवान पॉलिश केलेले हिरे मिळू शकतात, असे तज्ज्ञांचे मत आहे. हा हिरा उच्च (टाईप एलएलए) श्रेणीतील आहे. नायट्रोजनमुक्त असा कोणतीही रासायनिक अशुद्धता नसलेला हा हिरा नैसर्गिकरीत्या उपलब्ध असलेल्या सर्वात शुद्ध हिऱ्यायांपैकी एक मानला जातो. या हिऱ्यायाची गुलाबी छटा अत्यंत तीव्र आणि आकर्षक आहे, ज्यामुळे संग्रहक आणि गुंतवणूकदार यांच्यात त्याची मोठी मागणी आहे.



इतर हिऱ्यायांमध्ये रंग रासायनिक अशुद्धतेमुळे येतो; पण गुलाबी हिऱ्यायांचा रंग त्यांच्या अंतर्गत स्फटिक रचनेत (इंटरनल क्रिस्टल स्ट्रक्चर ) झालेल्या बदलांमुळे येतो. पृथ्वीच्या खोलवर अति उष्णता आणि दाबामुळे हिऱ्यायाच्या रचनेत विकृती (स्ट्रक्चरल डिफॉर्मेशन) निर्माण होतात, ज्यामुळे हिऱ्यायाला हा विशिष्ट गुलाबी रंग मिळतो. याच विकृतींमुळे गुलाबी हिरे अत्यंत मौल्यवान बनतात. लेसोथो या लहान देशासाठी हिरा उद्योग हा अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. काओ खाण विशेषतः दुर्मीळ रंगीत हिऱ्यायांसाठी प्रसिद्ध आहे.

या एकाच उच्च-मूल्याच्या हिऱ्यायाच्या विक्रीतून देशाला मोठे राष्ट्रीय महसूल मिळण्याची शक्यता आहे, ज्यामुळे देशाच्या आर्थिक स्थिरतेवर सकारात्मक परिणाम होईल. हा हिरा शोधणारी कंपनी स्टॉर्म माऊंटन डायमंडसब रिस्पॉन्सिबल ज्वेलरी कौन्सिलची सदस्य आहे, जी नैतिक आणि जबाबदार खाणकाम पद्धती सुनिश्चित करते.या महत्त्वपूर्ण शोधाने लेसोथोचे नाव जागतिक स्तरावर पुन्हा एकदा हिऱ्यायांचे प्रमुख उत्पादक म्हणून ठळक केले आहे.

## 'आळशी डोळा'ची चिंता मिटली?

संशोधकांना 'आळशी डोळा' नावाची समस्या उलटवण्यासाठी एक संभाव्य मार्ग सापडला आहे. विशेष म्हणजे, या पद्धतीमुळे लहानपणापासून ही समस्या असलेल्या प्रौढांमध्येही दृष्टी सुधारण्याची शक्यता आहे. सध्या तरी, हे तंत्र केवळ प्राण्यांवरच (उंदरांवर) तपासले गेले आहे. त्यामुळे मानवी रुग्णांसाठी वापरण्यापूर्वी यावर अधिक अभ्यास करणे आवश्यक आहे.

'सेल रिपोर्ट्स' जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या उंदरांवरील एका अभ्यासात ही नवीन पद्धत सादर करण्यात आली आहे. या पद्धतीमध्ये कमजोर डोळा तात्पुरता बंद केला जातो, ज्यामुळे ॲम्ब्लिओपिया बरा होण्यास मदत होते, अगदी दीर्घकाळ दृष्टीची समस्या असल्यानंतरही. या 'आळशी डोळ्या'ला पुन्हा सुरू केल्यामुळे दृष्टिपटलातून दृश्य सिग्नल मेंदूतील व्हिज्युअल कॉर्टेक्सपर्यंत पोहोचवणाऱ्याया चेतापेशींच्या क्रियाकलापात अचानक वाढ होते, असे दिसून आले.

या अभ्यासात सामील नसलेले कॅनडातील युनिव्हर्सिटी ऑफ वॉटरलू येथील स्कूल ऑफ ऑप्टोमेट्री अँड व्हिजन सायन्सचे प्राध्यापक आणि संचालक बेन



थॉम्पसन म्हणाले, 'ॲम्ब्लिओपियाच्या उंदराच्या मॉडेलमध्ये ॲम्ब्लिओपिक डोळा निष्क्रिय केल्याने दृष्टी परत येते, हे प्रोत्साहक आहे.' मात्र, ही पद्धत मानवांमध्ये सुरक्षित आणि प्रभावी आहे की नाही, हे पाहण्यासाठी अधिक संशोधन आवश्यक आहे, असे थॉम्पसन यांनी सांगितले. या अभ्यासात सामील नसलेले कॅलिफोर्निया विद्यापीठातील (बर्कले) ऑप्टोमेट्री आणि व्हिजन सायन्सचे प्राध्यापक डॉ. डेनिस लेव्ही यांनीही निष्कर्षांबद्दल सावधपणे आशावाद व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, पूर्वी शास्त्रज्ञांनी उंदरांमध्ये 'आळशी डोळा' बरा करण्याचे अनेक प्रयत्न केले, पण ते मानवांमध्ये प्रभावी ठरले नाहीत. मात्र, हे नवीन तंत्र आशादायक दिसत आहे.

**'आळशी डोळा' म्हणजे काय?**

ॲम्ब्लिओपिया, ज्याला 'आळशी डोळा' (लेझी आय) म्हणतात, लहानपणी विकसित होतो. यामध्ये मेंदू एका डोळ्याला दुसऱ्यायापेक्षा जास्त महत्त्व देतो, ज्यामुळे कमी महत्त्व दिलेल्या डोळ्याची दृष्टी हळूहळू कमी होते. यावरचा पारंपरिक उपचार म्हणजे डोळ्यावर मजबूत पट्टी लावणे, जेणेकरून मेंदूला कमजोर डोळ्यावर अवलंबून राहण्यास भाग पाडता येईल. मात्र, ही पद्धत केवळ लहानपणीच प्रभावी ठरते, जेव्हा दृष्टीचे नियंत्रण करणाऱ्याया मज्जातंतूंच्या जोडण्या अजून तयार होत असतात.

# पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेचा शुभारंभ

**विद्यार्थ्यांमार्फत राबविणार वृक्ष दत्तक योजना; जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिका व श्री साई द्वारका सेवा ट्रस्टचा उपक्रम**

नगर – पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे ऋतुमानात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात बदल होत असून त्याचा परिणाम थेट मानवी जीवनावर होताना दिसत आहे. वाढते तापमान, अवेळी पाऊस, बदलणारे हवामान आणि घटत चाललेली हरित संपदा ही चिंतेची बाब बनली आहे. या पार्श्वभूमीवर जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत अहिल्यानगर महानगरपालिका आणि श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेचा शुभारंभ जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या मैदानात करण्यात आला.



येथील न्यू आर्टस् महाविद्यालयाच्या मैदानावर वृक्षारोपण करून पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

यावेळी बोलताना उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी पर्यावरण संवर्धनाची गरज अधोरेखित करताना सांगितले की, सन १९९२ पासून आपण वृक्षारोपणाच्या अनेक मोहिमा पाहत आणि वाचत आलो आहोत. मात्र मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली जात असली तरी त्यांचे संवर्धन होताना फारसे दिसत नाही. त्यामुळेच यावर्षी अहिल्यानगरमध्ये तब्बल ४२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. शहरांमध्ये वाढणारे काँक्रीटीकरण, रस्त्यांचे जाळे आणि झपाट्याने कमी होणारे हरित क्षेत्र यामुळे तापमानात सातत्याने वाढ होत आहे. ज्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षसंपदा आहे, त्या ठिकाणी तापमान तुलनेने कमी असल्याचे दिसून येते. पुढील पिढ्यांना शुद्ध हवा, स्वच्छ पर्यावरण आणि समृद्ध निसर्ग मिळावा यासाठी वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे संवर्धन ही काळाची गरज बनली आहे. हे एकट्या–दुकट्याचे काम नाही. वृक्षारोपण आणि संवर्धनासाठी लोकचळवळ उभी राहणे आवश्यक आहे. विशेषतः युवा पिढीने पुढे येऊन या मोहिमेचे नेतृत्व करणे गरजेचे आहे. वाढदिवस, सामाजिक कार्यक्रम, उत्सव आणि इतरप्रसंगी वृक्षारोपण करण्याची सवय समाजात रुजली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेमध्ये लाखो विद्यार्थी घडले असून समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी मोठे योगदान दिले आहे. याच विद्यार्थ्यांच्या माध्यमातून आता विद्यार्थी वृक्ष दत्तक योजना राबविण्यात येणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने एक तरी वृक्ष दत्तक घेऊन त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारल्यास भविष्यात शहरात मोठ्या प्रमाणावर हरित क्षेत्र निर्माण होऊ शकते, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात क्रांती होत असली तरी शुद्ध हवा, ऑक्सिजन, पाऊस आणि पर्यावरणीय संतुलन यासाठी वृक्षांनाच पर्याय नाही. एआय मानवी जीवन सुलभ करू शकते, मात्र निसर्गाची जागा घेऊ शकत नाही. त्यामुळे एआय तंत्रज्ञान कितीही पुढे गेले तरी वृक्षारोपण आणि संवर्धनाशिवाय पर्याय नाही, असे मत उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी व्यक्त केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, उपायुक्त मेहर लहारे, संस्थेच्या खजिनदार दीपलक्ष्मी म्हसे, उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर, अनिल आठरे, प्रा. हर्षल आगळे, इंजिनिअर कैलास दिघे, राजेंद्र पवार, प्रा. गणेश निमसे, प्रा. भरत होळकर, संतोष कानडे, सुरेश खामकर, अमित खामकर, उद्यान प्रमुख शशिकांत नजन, मल्हार गंधे, प्रा. भगवान कुंभार, राजू पाटील, जगन्नाथ साबळे, रवींद्र वर्पे, तुळशीराम पालीवाल, डॉ. अशोक काळे, नितीन धांडे, कारभारी गायकवाड, अजित कटारिया उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विद्यार्थी दत्तक वृक्ष मोहीम राबविण्यात येणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला एक वृक्ष देऊन त्याचे संगोपन आणि संवर्धन करण्याची जबाबदारी दिली जाणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये वृक्षप्रेम आणि पर्यावरण संवर्धनाची भावना रुजविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरेल. पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेमुळे अहिल्यानगर अधिक हरित आणि पर्यावरणपूरक शहर बनण्यास मदत होईल. या मोहिमेसाठी संस्थेचे पूर्ण सहकार्य राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर म्हणाले, जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने महानगरपालिकेच्या माध्यमातून पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेची प्रभावी सुरुवात करण्यात आली आहे. न्यू आर्ट्स कॉलेजच्या मैदानावर विविध वृक्षांची लागवड करण्यात आली असून पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड आणि संवर्धनाची आवश्यकता आहे. महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येणार असून नागरिकांनीही यात सक्रिय सहभाग घ्यावा.

या उपक्रमांतर्गत बकुळ, कडुलिंब, चिंच, पिंपळ यांसारख्या देशी आणि पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. देशी वृक्षांमुळे जैवविविधतेचे संवर्धन होण्यास मदत होते तसेच वातावरणातील तापमान नियंत्रणात राहण्यास हातभार लागतो, असे सांगण्यात आले.

प्रास्ताविक प्रा. हर्षल आगळे यांनी केले. ग्रीन सिटी मोहिमेची संकल्पना, उद्दिष्टे आणि भविष्यातील नियोजन याविषयी त्यांनी माहिती दिली. आभार इंजिनिअर कैलास दिघे यांनी मानले. पर्यावरण संवर्धनासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. अहिल्यानगरला हरित, स्वच्छ, प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक शहर बनविण्याच्या दिशेने पालकमंत्री ग्रीन सिटी मोहीम हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# वृक्षारोपण आणि प्लास्टिक मुक्तीचा संदेश देत हरदिन मॉर्निंग ग्रुपचा पर्यावरण दिन उत्साहात

नगर – हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ऐतिहासिक चाँदबीबी महाल परिसरात वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि प्लास्टिकमुक्ती जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने घेण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. त्यानंतर डोंगर परिसर व चाँदबीबी महाल परिसरात स्वच्छता अभियान राबवून प्लास्टिक व इतर कचरा संकलित करण्यात आला. पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या प्लास्टिकच्या वापराविरोधात जनजागृती करण्यात आली. विशेष म्हणजे लावण्यात आलेल्या प्रत्येक वृक्षाच्या संगोपन व संवर्धनाची जबाबदारी ग्रुपच्या सदस्यांनी स्वीकारली.




यावेळी संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, राजू कांबळे, पवन वाघमारे, रमेश वराडे, जहीर सय्यद, सचिन चोपडा, सर्वेश सपकाळ, मेजर दिलीप ठोकळ, अशोक पराते, ताराचंद ठोकळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, अविनाश पोतदार, अभिजीत सपकाळ, यशराज माने, मनोज मेहेर, सायकलपटू त्रिंबकराव नेटके, सचिन पेंढूरकर, दिलीप गुगळे, नवनाथ वेताळ, जालिंदर अळकुटे, रामनाथ गर्जे, दीपक धाडगे, मनोहर दरवडे, मुन्ना वाघस्कर, किरण फुलारी, प्रकाश देवळालीकर, दीपक घोडके, ॲड. उद्धव चिमटे, आराध्या परदेशी, सोहम चेमटे, सूर्यकांत कटोरे, यश भिंगारदिवे, रतन मेहेत्रे, सुधीर कपाळे, सखाराम अळकुटे, अविनाश जाधव, उत्तम वाघस्कर, दशरथराव मुंडे, प्रशांत भिंगारदिवे, राजू शेख, भारत कनोजिया, अजय झिंजे, आनंद दळवी, राकेश वाडेकर, सतीश काळे यांच्यासह अनेक पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

प्रा. माणिक विधाते म्हणाले, पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज बनली आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा वाढता वापर यामुळे पर्यावरणासमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. अशा परिस्थितीत प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. वृक्ष हे केवळ पर्यावरणाचे रक्षक नसून भावी पिढ्यांसाठी अमूल्य ठेवा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे यांनी सांगितले की, निसर्गाचे जतन करणे ही केवळ सामाजिक नव्हे तर आध्यात्मिक जबाबदारीदेखील आहे. वृक्ष, जलस्रोत आणि जैवविविधता यांचे संरक्षण करणे म्हणजे सृष्टीची सेवा करणे होय. मानवाने निसर्गाशी सुसंवाद साधून जीवन जगले तरच भविष्यातील संकटे टाळता येतील. पर्यावरण संवर्धनाचा संस्कार पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले. शेवटी उपस्थितांनी पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि प्लास्टिकमुक्त समाज निर्माण करण्याची शपथ घेतली.

# वृक्ष संवर्धनासाठी नागरिकांनी पुढे यावे

**संरक्षण सहाय्यक हरिश दसरे यांचे प्रतिपादन; पर्यावरण दिनानिमित्त जुन्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात वृक्षारोपण**

नगर – पर्यावरणाचा दिवसेंदिवस ढासळत चाललेला समतोल व वाढते प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी शहरी भागात वृक्षारोपण व त्यांचे संवर्धन अत्यंत आवश्यक आहे. सरकारी यंत्रणा आपापल्या स्तरावर पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षरोपण अभियान राबवित असतात. मात्र नागरिकांनी देखील वृक्ष संवर्धनासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे सर्वेक्षण सहाय्यक हरिष दसरे यांनी केले.


जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जुन्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात नगर उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांचे हस्ते व हरीष दसरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जुन्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात नगर उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांचे हस्ते व हरीष दसरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये वृक्षारोपण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

गेल्या काही वर्षांमध्ये शहरी भागातील तापमान ४० अंशांच्या पुढे चालले आहे. निसर्गाने दिलेली ही चेतावणी असून लागवडीसाठी योग्य अशा जागेमध्ये मोठ्या प्रमाणात भारतीय प्रजातीची सावली देणारी झाडे लावणे व त्यांचे संवर्धन करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी नगर भाग उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी व्यक्त केले.

संवर्धन व देखभाल सुलभ व्हावे या दृष्टीने ८ ते १० फूट उंचीची करंज जातीची झाडे या परिसरात लावण्यात आली.

या कार्यक्रमास अहमदनगर वस्तुसंग्रहालयाचे अभिरक्षक संतोष यादव, नारायण आव्हाड, संदीप हापसे, योगेश पवार, हरीभुमी प्रतिष्ठानचे अभय ललवाणी, उल्हास नांगरे, रिजवान कादर शेख आदी उपस्थित होते.


# स्वस्तात सोन्याचे आमिष दाखवून जिल्हा परिषद सदस्यासह तिघांना मारहाण करीत नगरजवळ ५२ लाख रुपयांना लुटले

नगर – सोन्याचे आमिष दाखवून एका व्यापाऱ्याला बोलावून घेऊन त्याला आणि त्याच्या साथीदारांना लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने मारहाण करत ५२ लाख ८० हजार रुपयांची रोकड व दागिने लुटल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. ही घटना ४ जून २०२६ रोजी सायंकाळी अहिल्यानगर जिल्ह्यातील बुरूडगाव शिवारातील रेल्वे उड्डाणपुलाजवळ घडली.

फिर्यादी अविनाश अनिल नलावडे (वय ३४, रा. सणसवाडी, ता. मानगाव, जि. रायगड) हे व्यवसायाने बिल्डर असून, ते निजामपूर (जि. रायगड) येथे जिल्हा परिषद सदस्य म्हणून कार्यरत आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांची भेट राजू मोहिते याच्याशी झाली होती. राजू मोहिते याने आपल्या ओळखीच्या बापू पवार याच्याकडे अर्धा किलो सोने असल्याचे सांगून त्यांना सोन्याचे आमिष दाखवले. आरोपींनी फिर्यादीला सोन्याची खरेदी करण्याच्या बहाण्याने वारंवार वेगवेगळ्या ठिकाणी बोलावले. अखेर ४ जून रोजी त्यांना अहिल्यानगरजवळील बुरूडगाव शिवारात नगर–दौण्ड रोडजवळील रेल्वे उड्डाणपुलाजवळ बोलावले. तेथे पोहोचताच राजू मोहिते, अक्षय मोहिते, बापू पवार आणि इतर १० ते १२ अनोळखी इसमांनी फिर्यादी व त्यांच्या साथीदारांना मारहाण केली. आरोपींनी फिर्यादीच्या गाडीतून खाली ओढून त्यांना लोखंडी रॉड आणि लाकडी दांडक्याने जबर मारहाण केली. यावेळी आरोपींनी ४६ लाख रुपयांची रोकडे, साडेतीन तोळ्यांची सोन्याची चैन (किंमत ३ लाख ३० हजार रुपये), महाकालीचे लॉकेट असलेली चैन (किंमत १ लाख रुपये) आणि अडीच तोळ्यांच्या तीन सोन्याच्या अंगठ्या (किंमत २ लाख ५० हजार रुपये) असा सुमारे ५२ लाख ८० हजारांचा ऐवज लुटून पोबारा केला.

याप्रकरणी अविनाश नलावडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी राजू मोहिते, अक्षय मोहिते, बापू पवार आणि त्यांच्या १० ते १२ साथीदारांविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# अहिल्यानगरमध्ये अन्न भेसळविरोधी कारवाई; आईस्क्रीम व खाद्यतेलाचा लाखोंचा साठा जप्त

नगर – जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या अन्न भेसळविरोधी विशेष मोहिमेत राहुरी व नेवासा तालुक्यात कारवाई करून २ लाख ८४ हजार १८० रुपये किमतीचे संशयित आईस्क्रीम व खाद्यतेल जप्त करण्यात आले असून नागरिकांना अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत शंका असल्यास प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त अन्न अ. अ. भोईटे यांनी केले आहे.


राहुरी येथील शिवशक्ती आईस्क्रीम या आस्थापनाची तपासणी करून शिवशक्ती ब्रँडच्या आईस्क्रीम गुलकंद व अमेरिकन नट्स या उत्पादनांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. दर्जाहीन असल्याच्या संशयावरून या ठिकाणी ४१ हजार ४४० रुपये किमतीचे एकूण १४८ पॅकेट्स आईस्क्रीम जप्त करण्यात आले. तसेच नेवासा तालुक्यातील कडू गल्ली येथील संतोष किराणा स्टोअर्सची तपासणी करून एसबीजी ब्रँडच्या रिफाइंड पामोलीन ऑईल या खाद्यतेलाचा नमुना तपासणीसाठी घेण्यात आला. हा साठा संशयास्पद आढळल्याने २ लाख ४२ हजार ७४० रुपये किमतीचे १ हजार ४९८.४ किलो खाद्यतेल जप्त करण्यात आले.

अन्न व औषध विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार व सहआयुक्त श्रीकांत करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ व नियम २०११ अंतर्गत ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार, अन्न सुरक्षा अधिकारी उ. र. पाटील व सहायक आयुक्त अन्न अ. अ. भोईटे यांनी या कारवाया केल्या आहेत.

नागरिकांना स्वच्छ व भेसळमुक्त अन्न उपलब्ध व्हावे यासाठी जिल्हाभर ही मोहीम अधिक व्यापक स्वरूपात सुरू आहे. अन्न सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पार्वतीबाई म्हस्के शाळेत वृक्षारोपण


नगर – जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगावने संचलित ’पार्वतीबाई म्हस्के प्राथमिक विद्यालयात’ ५ जून जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्याध्यापक दत्तात्रय झगडे आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



शाळेच्या परिसरात फुलझाडे, औषधी वनस्पती तसेच लिंबू, आंबा, जांभूळ, बदाम, करंजी इत्यादी झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

वृक्षारोपण हा पर्यावरण रक्षणाचा सर्वात सोपा आणि प्रभावी उपाय आहे, वृक्षारोपणा बरोबरच वृक्ष संवर्धन करणे हे सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे असे मुख्याध्यापक झगडे सर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले.

पार्वतीबाई म्हस्के शाळेमध्ये विविध प्रकारचे सावली देणारे झाडे असल्यामुळे या शाळेचा दररोजचा परिपाठ पूर्ण वर्षभर सावलीमध्ये होत असतो. भविष्यात विविध प्रकारची झाडे शाळेत लावण्याचा संकल्प यावेळी मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी केला. कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय झगडे, शैलजा कर्डिले, वंदना खिंदारे, हर्षा थोरात, ज्योती सोनवणे, शकील सय्यद, सिंधू कौलस्कर आदी उपस्थित होते.


सराईत दुचाकी चोराला पकडल्या नंतर त्याच्या समवेत तोफखाना पोलिसांचे पथक.

# मौजमजेसाठी चोरलेल्या १२ दुचाकींसह सराईत चोरटा जेरबंद

नगर – केवळ मौजमजा करण्यासाठी दुचाकी चोरी करणाऱ्या एका सराईत वाहनचोराला तोफखाना पोलिसांनी अटक केली आहे. या चोरट्याकडून तब्बल १२ दुचाकी जप्त करण्यात आल्या असून त्यांची एकूण किंमत सहा लाख ६० हजार रूपये इतकी आहे. या कारवाईमुळे तोफखाना पोलीस ठाण्यातील चार आणि कोतवाली पोलीस ठाण्यातील एका गुन्ह्याची उकल झाली आहे.

तोफखाना पोलीस ठाणे हद्दीतील चोरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांनी गुन्हे शोध पथकाला विशेष सूचना देत चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर व त्यांच्या पथकाने गस्तीदरम्यान संशयास्पद हालचाली करणाऱ्या एका इसमाला विना नंबरच्या दुचाकीसह ताब्यात घेतले. पोलिसांनी थांबण्याचा इशारा दिल्यानंतर तो पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना त्याला पकडण्यात आले. चौकशीत त्याने आपले नाव कृष्णा उमेश अंतरकर (वय २९, रा. शिवशक्तीनगर, ता. पाथर्डी) असे सांगितले. सुरूवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या संशयित आरोपीची अधिक कसून चौकशी केली असता त्याने अहिल्यानगर शहरातील विविध भागांतून अनेक दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. यानंतर पोलिसांनी संशयित आरोपीकडून विविध ठिकाणांहून चोरी केलेल्या १२ दुचाकी जप्त केल्या.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर, पो.हे.कॉ नितिन उगलमुगले, अरुण गांगुर्डे, भानुदास खेडकर, अब्दुलकादर इनामदार, सुधीर खाडे, पो.कॉ सुमित गवळी, अविनाश बर्डे, सतिष त्रिभुवन, सुजय हिवाळे, भागवत बांगर, सतिष शिंदे, शाकीर सय्यद, बाळासाहेब भापसे, कपिल गायकवाड, म.पो.ना जिजा खुडे, म.पो.कॉ कल्पना अवसरे यांच्या पथकाने केली आहे. सदर गुन्ह्याच्या तांत्रिक तपासकामी दक्षिण मोबाईल सेलचे पो.कॉ राहुल गुंडु, नितिन शिंदे, अरुण सांगळे यांनी मदत केली आहे.

# नगर जिल्हा पोलीस दलातील सुमारे ३०० कर्मचाऱ्यांच्या बदल्या

नगर – जिल्हा पोलीस दलातील चालू वर्षातील सुमारे ३०० पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या ४ जून रोजी पोलीस मुख्यालयात पार पडल्या. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी आयोजित केलेल्या बदली दरबारात प्रत्येक कर्मचार्याची भूमिका, गरज आणि पसंती जाणून घेत बदली प्रक्रिया राबविण्यात आली.

एका पोलीस ठाण्यात किंवा शाखेत सलग अथवा खंडित स्वरूपात पाच वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांकडून यापूर्वी तीन पसंतीच्या ठिकाणांसह अर्ज मागविण्यात आले होते. बदलीपात्र कर्मचाऱ्यांना ४ जून रोजी सकाळी पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले होते. प्रत्येक अंमलदाराशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांची भूमिका जाणून घेतल्यानंतर बदलीचे आदेश देण्यात आले. सकाळी साडेआठ वाजता सुरू झालेल्या या प्रक्रियेला पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्यासह अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे उपस्थित होते.

बदली प्रक्रियेत प्रथम श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, सहायक फौजदार आणि पोलीस हवालदार यांच्या बदल्या करण्यात आल्या. गुन्हे तपासाची जबाबदारी असलेल्या या अंमलदारांपैकी अनेक जण गेल्या अनेक वर्षांपासून अहिल्यानगर शहर व परिसरातील पोलीस ठाण्यांमध्ये कार्यरत होते. त्यामुळे जिल्ह्याच्या उत्तर व दक्षिण भागातील काही पोलीस ठाण्यांमध्ये तपास अंमलदारांची कमतरता निर्माण झाली होती. ही तूट भरून काढण्यासाठी काही तपास अंमलदारांच्या बदल्या त्यांच्या पसंतीपेक्षा रिक्त जागांचा विचार करून करण्यात आल्या. मात्र, काही कर्मचाऱ्यांना अपेक्षित पोलीस ठाणे न मिळाल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. काही महिला पोलिसांच्या डोळ्यांत अश्रूही दिसून आले. त्यानंतर पोलीस नाईक, पोलीस शिपाई आणि चालक यांच्या बदल्या करण्यात आल्या. या कर्मचाऱ्यांच्या पसंतीचा मोठ्या प्रमाणावर विचार झाल्याने अनेकांनी समाधान व्यक्त केले.

दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेत (एलसीबी) बदली मिळावी, अशी अनेक कर्मचाऱ्यांची इच्छा होती. अर्जातील पसंतीक्रमात एलसीबीचा समावेश असतानाही अधीक्षक सुदर्शन यांनी कोणालाही एलसीबीमध्ये बदली दिली नाही. त्यामुळे एलसीबीत जाण्याची अपेक्षा बाळगणाऱ्या कर्मचाऱ्यांचा हिरमोड झाला. काही पोलिसांनी विनंती बदल्यांसाठी अर्ज केले असले तरी त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. सध्या केवळ प्रशासकीय बदल्या करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

